नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक २०४ * * अकोला * सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## प्रजेला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा!




भारताच्या प्रजेला आज प्रजासत्ताकाच्या शुभ दिनी आपल्या देशाचे नागरिक होण्याचा बहुमान मिळाला. स्वातंत्र्यपूर्वी राजे-महाराजे होते इंग्रज होते. पण आजच्या दिवशी १९५० साली आपण खऱ्या अर्थाने मूलभूत अधिकारांसह या देशाचे स्वतंत्र नागरिक झालो. त्यानंतरच्या वर्षांमध्ये भारताने अनेक प्रगतीची पावले उचलली. पूर्वी एखाद्या जिल्ह्यामध्ये त्याकाळी अत्यंत कमी मोटारगाड्या असायच्या, आता त्याच्या लाख पटीपेक्षाही जास्त गाड्यांची संख्या आहे. संपूर्ण भारतातील चकाचक रस्ते, भारतीय जनांचे सुधारलेले जीवनमान, भारताची वाढलेली आर्थिक शक्ती, भारताचे आदर्श सैन्यबळ, अन्नधान्याच्या बाबत देशाची आत्मनिर्भरता, आरोग्यविषयक सुधारणा, जनसामान्यांना मिळणाऱ्या सुविधा किंवा सवलती, शेतीची वाढलेली उर्वराशक्ती, वाहनांचा वाढलेला वेग, रेल्वेगाड्यातील महासुविधा, प्रचंड प्रमाणात वाढत असलेली विमान सेवेची दळणवळण व्यवस्था, वगैरे वगैरे ही सर्व आपल्या भारताच्या प्रगतीची पावले आहेत. आज जगात भारताला कोणीही डावलू शकत नाही, अशी आपली कीर्ती आहे. अशा या भारत मातेच्या वैभवाला आम्ही अभिवादन करतो. हा आपला सार्वभौम देश असाच गगनभेदी विकास करो. या शुभेच्छा देताना आमचे हृदय अत्याधिक अभिमानाने भरून आलेले आहे. भारताला आंतरराष्ट्रीय जगतात अधिक मानाचे स्थान मिळावे, हीच आमची अपेक्षा आहे. जयहिंद !

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# खेडकर, श्रीरंग लाड, फर्नांडिस यांना पद्मश्री जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :
प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने २०२६ वर्षासाठीच्या प्रतिष्ठित पद्म पुरस्कारांची घोषणा केली आहे. यावर्षी ४५ मान्यवरांचा पद्म पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. या मानाच्या यादीत महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील दिग्गजांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. राज्याच्या मातीतील कला जिवंत ठेवणारे लोकनाट्य तमाशा महर्षी रघुवीर खेडकर, वैद्यकीय क्षेत्रातील सेवाव्रती डॉ. अर्मिडा फर्नांडिस, कापूस संशोधनात क्रांती घडवणारे परभणीचे शेतकरी श्रीरंग लाड आणि तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर झाला आहे.

देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानामध्ये समाविष्ट असलेला पद्म पुरस्कार पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण अशा ३ श्रेणींमध्ये दिला जातो कला, समाजसेवा, विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसाय, उद्योग, वैद्यक, साहित्य, शिक्षण, क्रीडा आणि नागरी सेवा अशा विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी हे पुरस्कार दिले जातात. यावर्षी महाराष्ट्रातील तिघांना आपापल्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीसाठी पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.



पद्मश्री पुरस्कारांची घोषणा

नगर जिल्ह्यातील तमाशा परंपरेचा वारसा समर्थपणे पुढे नेणारे ज्येष्ठ लोकनाट्य कलाकार रघुवीर खेडकर यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

मुंबईतील सायन रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता आणि 'स्नेहा' संस्थेच्या संस्थापिका डॉ. अर्मिडा फर्नांडिस यांना वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कार्यासाठी पद्मश्री जाहीर झाला आहे. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील शेतकरी श्रीरंग लाड यांना कापूस संशोधनातील त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रयोगांसाठी पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. आदिवासी वारली संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या 'तारपा' वाद्याला जागतिक ओळख मिळवून देणारे ज्येष्ठ कलाकार भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर झाला आहे.

### महाराष्ट्रातील १५ जणांना पद्म पुरस्कार

महाराष्ट्रातून दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना पद्मविभूषण, तर अलका याज्ञिक, दिवंगत पीयूष पांडे(मरणोत्तर), उदय कोटक यांना पद्मभूषण तर क्रिकेटपटू रोहित शर्मा, अभिनेता आर माधवन, लोकनाट्य कलावंत रघुवीर खेडकर, डॉ. अर्मिडा फर्नांडिस, तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा व श्रीरंग लाड यांच्यासह 11 पद्मश्री पुरस्काराची घोषणा झाली आहे.

गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानातून

## मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा

■ वृत्तसंस्था, नांदेड, दि. २५ :
हिंद-दी-चादर गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान मानवी मूल्यांसाठी होते. त्यांचे बलिदान आपल्याला सत्य, धर्म आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी निर्भीडपणे उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच त्यांचे विचार राज्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. ते म्हणाले की, गुरू तेग बहादुर साहिबजी यांनी दिलेले बलिदान हे केवळ शीख धर्मासाठी नव्हते, तर या देशाची संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि धर्म यांच्या रक्षणासाठी होते. त्यांचा पराक्रम, वीरता, शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने समाज नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत एकत्र आला आहे. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानामुळे संपूर्ण देशात धर्म, स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानासाठी लढण्याची नवी चेतना निर्माण झाली. त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा, यासाठी शहीदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर जावून श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शीख गुरूंचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

हैदराबादमधील फर्निचर दुकानात भीषण आग

## पाच जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था,हैदराबाद, दि. २५ :
शहरातील नामपल्ली भागात शनिवारी रात्री चार मजली फर्निचर दुकानात भीषण आग लागली. आगीमुळे पाच जण इमारतीत अडकले होते. आता पाचही जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. रात्रभर बचाव कार्य सुरू होते. आगीत अडकलेल्या पाचही जणांच्या मृत्यूची पुष्टी पोलिसांनी केली आहे. सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. वृत्तानुसार, हे लोक तळघरात होते. आगीमुळे ते पळून जाऊ शकले नाहीत, ज्यामुळे पाच जणांचा मृत्यू झाला. अधिकाऱ्यांच्या मते, शनिवारी इमारतीत मोठी आग लागली आणि तळघरात अडकलेल्या पाच जणांना वाचवण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, "इमारतीतून एका महिलेसह पाच जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

### सुटीची सूचना

प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने मंगळवार दि. २७ जानेवारी २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही.
सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.
व्यवस्थापक

## देशाच्या विकासात महिलांचा सहभाग वाढला

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. २५ :
७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाला संबोधित केले. यावेळी त्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, हा उत्सव देशवासियांमध्ये राष्ट्रीय एकता आणि अभिमानाची भावना दृढ करतो.



राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या की, यावर्षी प्रजासत्ताक दिनासोबतच वंदे मातरम ला १५० वर्षे पूर्ण झाल्याचा उत्सवही साजरा केला जात आहे. प्रजासत्ताक दिनाचा हा पवित्र दिवस आपल्याला देशाच्या भूतकाळावर, वर्तमानावर आणि भविष्यावर विचार करण्याची आणि समजून घेण्याची संधी देतो. काळानुसार आपल्या देशाची स्थिती बदलली आहे. भारत स्वतंत्र झाला आणि आपण स्वतः आपल्या देशाचे भविष्य ठरवणारे बनलो.

त्या म्हणाल्या की, देशाच्या विकासात महिलांचा सहभाग वाढला आहे. ५७ कोटी जन-धन खात्यांपैकी ५६ टक्के खाती महिलांची आहेत. १० कोटींहून अधिक स्वयं-सहायता गट आहेत. खेळामध्ये आपल्या मुलींनी विक्रम केले आहेत. महिला क्रिकेट संघाने आयसीसी क्रिकेट विश्वचषक, ब्लाइंड विश्वचषक जिंकला आहे. नारी शक्ती कायद्यामुळे देशातील महिला आणखी सशक्त होतील.

## ज्येष्ठ पत्रकार मार्क टली यांचे निधन

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, दि. २५ :
ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक मार्क टली यांचे रविवारी दिल्लीतील एका खाजगी रुग्णालयात निधन झाले. ते ९० वर्षांचे होते.



त्यांचे जवळचे मित्र सतीश जेकब यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला ही माहिती दिली. मार्क टली काही काळापासून आजारी होते आणि गेल्या एका आठवड्यापासून साकेत येथील मॅक्स रुग्णालयात दाखल होते. सतीश जेकब यांनी सांगितले की, मार्क यांचे रविवारी दुपारी साकेत येथील मॅक्स रुग्णालयात निधन झाले. मार्क टली यांचा जन्म कोलकाता येथे झाला होता. ते २२ वर्षे बीबीसीचे नवी दिल्ली ब्युरो प्रमुख होते. ते एक प्रसिद्ध लेखकही होते आणि बीबीसी रेडिओ ४ च्या 'समथिंग अंडरस्टूड' या कार्यक्रमाचे सादरकर्ते होते. त्यांना २००२ मध्ये 'नाइट' ही पदवी देण्यात आली होती आणि २००५ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते. मार्क टली यांनी भारतावर अनेक पुस्तके लिहिली, ज्यात 'नो फुल स्टॉप्स इन इंडिया', 'इंडिया इन स्लो मोशन' आणि 'द हार्ट ऑफ इंडिया' यांचा समावेश आहे.









### कमळाचा हिरवा देठ म्हणजे एमआयएम का?

## सुषमा अंधारेंचा सवाल



■ **मुंबई :** देशात आणि महाराष्ट्रात सुरू असलेल्या सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे कोण कोणासोबत कधी युती करेल किंवा कोणता नेता कधी पक्ष बदलेल, याचा अंदाज लावणं कठीण झालं आहे. अशाच अनपेक्षित राजकीय समीकरणांचा अनुभव सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात पाहायला मिळतो आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपविरोधात दोन शिवसेना आणि दोन राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन निवडणूक लढवत असल्याने राज्यभरात चर्चेला उधाण आलं आहे. कट्टर विरोधक असलेल्या दोन शिवसेनेला एकत्र आणण्याची कसरत बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनी केल्याचं सांगितलं जात आहे. या निर्णयामुळे अनेक नेते आणि राजकीय निरीक्षक चकित झाले असून, यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख सुषमा अंधारे यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. सुषमा अंधारे यांनी ठामपणे सांगितले की, बार्शीतील हा निर्णय पक्षाचा अधिकृत निर्णय नाही. तो तिथल्या आमदारांनी त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीने घेतलेला निर्णय आहे. शिवसेना युबीटीची अधिकृत भूमिका वेगळी असून, या युतीला पक्षाची मान्यता नाही. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्वतः आमदारांशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. आम्ही भाजपला हरवण्यासाठी जे कोणी लढत आहेत, त्यांच्या सोबत आहोत. मात्र बार्शीतील युती ही आमची युती नाही, असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले. बार्शीत पक्षाला किंवा कार्यकर्त्यांना आपली गरज भासली, तर पक्षप्रमुखांशी चर्चा करून भूमिका ठरवू, असंही अंधारे म्हणाल्या.

# भाजप-महायुतीचा 'बिनविरोध' धमाका

### ११ जागांवर विरोधकांची माघार, भाजपचे १० तर शिंदे सेनेचा १ उमेदवार विजयी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**



नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही भाजप-महायुतीचा 'बिनविरोध' पॅटर्न पाहायला मिळत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा परिषद निवडणुकीत आज महायुतीने विरोधकांना मोठा धक्का दिला असून, तब्बल ११ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये भाजपचे १० आणि शिवसेना (शिंदे गट) या पक्षाच्या एका उमेदवाराचा समावेश आहे.

सिंधुदुर्ग हा भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा मूळ जिल्हा असून, येथे खासदार नारायण राणे आणि आमदार नितेश राणे यांचा मोठा प्रभाव आहे. राणे पिता-पुत्रांच्या राजकीय व्यूहरचनेमुळे जिल्ह्यातील अनेक जागांवर विरोधकांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. अर्ज मागे घेण्याची मुदत २७ जानेवारीपर्यंत असली तरी, त्यापूर्वीच ११ जागांवर महायुतीचा विजय निश्चित झाला आहे. विशेषतः कणकवली आणि देवगड या बालेकिल्ल्यांमध्ये विरोधकांनी चक्क 'नांग्या' टाकल्याचे चित्र पाहायला मिळाले.

जिल्हा परिषद गटाचा विचार केला तर ५ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. यामध्ये खारेपाटणमधून भाजपच्या प्राची इस्वलकर, देवगड तालुक्यातील पडेलमधून सुयोगी रवींद्र घाडी, बापर्डेमधून अवनी अमोल तेली आणि बांदा मतदारसंघातून प्रमोद कामत या भाजप उमेदवारांनी बाजी मारली आहे, तर जानवली जिल्हा परिषद गटातून शिंदे सेनेच्या रुहिता राजेश तांबे या बिनविरोध निवडून आल्या आहेत.

पंचायत समिती गणांमध्येही महायुतीने सहाही जागांवर निर्विवाद वर्चस्व मिळवले असून, हे सर्व उमेदवार भाजपचेच आहेत. यामध्ये कणकवली तालुक्यातील बिडवाडी गणातून संजना संतोष राणे आणि वरवडे गणातून राजेश (सोनू) सावंत यांचा समावेश आहे. देवगड तालुक्यात पडेलमधून अंकुश यशवंत ठूकरूल, नाडणमधून गणेश सदाशिव राणे आणि बापर्डे गणातून संजना संजय लाड यांनी बिनविरोध विजय मिळवला आहे. तसेच वैभववाडी तालुक्यातील कोकिसरे गणातून साधना सुधीर नकाशे या देखील बिनविरोध निवडून आल्या आहेत. या सर्व जागांवर विरोधकांनी दिलेले आव्हान माघारी घेतल्याने महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

पालकमंत्री आणि स्थानिक नेत्यांनी उर्वरित ४५ जागांवरही जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. हा विजय म्हणजे जनतेचा राणे कुटुंबीयांवरील विश्वास आणि महायुतीच्या कामाची पावती आहे, अशी भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच २७ जानेवारी रोजी आणखी काही ठिकाणी विरोधक माघार घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## धक्का लागल्याच्या किरकोळ वादातून प्राध्यापकाची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**

मुंबईतील उपनगरीय रेल्वे प्रवासादरम्यान एका किरकोळ धक्क्याचे पर्यावसान प्राध्यापकाच्या हत्येत झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. मालाड स्थानकातील फलाट क्रमांक १ वर शनिवारी रात्री विलेपार्ले येथील एन.एम. महाविद्यालयाचे प्राध्यापक आलोक सिंह (३१) यांची हिरेजडित वस्तू हाताळण्यासाठी वापरण्यात येणारा चिमटा भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणी रेल्वे पोलिसांनी वेगाने हालचाली करत आरोपी ओंकार शिंदे (२७) याला वसई स्थानकातून अटक केली आहे.

प्राध्यापक आलोक सिंह हे शनिवारी रात्री विलेपार्ले येथून लोकल ट्रेनने मालाड येथे पोहोचले होते. मालाड स्थानकात गाडी थांबल्यावर उतरताना दरवाजाजवळ उभ्या असलेल्या ओंकार शिंदे याला त्यांचा चुकून धक्का लागला. या एका साध्या धक्क्यावरून दोघांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली. मात्र, या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि ओंकारने संतापाच्या भरात आपल्याकडील हिरेजडित वस्तू हाताळण्यासाठी वापरण्यात येणारा चिमटा काढून आलोक सिंह यांच्या पोटात खुपसला. सिंह रक्ताच्या थारोळ्यात कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर आरोपी ओंकार शिंदे तिथून पसार झाला होता. रेल्वे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपासचक्र फिरवले. स्थानकातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता आरोपीची ओळख पटली.

तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ओंकारला वसई रेल्वे स्थानकातून ताब्यात घेतले. आरोपी ओंकार हा मालाड येथील कुरार व्हिलेजचा रहिवासी असून, त्याला सध्या बोरिवली पोलिस ठाण्यात ठेवण्यात आले आहे.

## होय, मी भाजपला मदत केली



■ **जळगाव :** जळगाव जिल्ह्याचे राजकारण नेहमीच चर्चेत असते, मात्र यावेळी निमित्त ठरले आहे ते मंत्री गुलाबराव पाटील आणि ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्यातील वाकयुद्ध. गुलाबराव पाटील यांनी नाथाभाऊंवर केलेल्या टीकेला उत्तर देताना खडसेंनी अनेक गौप्यस्फोट केले आहेत. मुक्ताईनगर नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादीचे नेते असूनही त्यांनी भाजपला मदत केल्याचा आरोप पाटलांनी केला होता. त्यावर नाथाभाऊंनी 'खरं बोलायला काय हरकत आहे? होय, मी भाजपला मदत केली' असे म्हणत स्थानिक गणिते वेगळी असल्याचे स्पष्ट केले. गुलाबराव पाटील यांनी एका सभेत दावा केला होता की, "नाथाभाऊंनी मला खूप त्रास दिला, त्याचीच फळं ते आता भोगत आहेत." यावर पलटवार करताना खडसे म्हणाले, "मी जिल्ह्यात अनेकांना त्रास दिला हे खरं आहे, पण तो त्रास केवळ भ्रष्ट प्रवृत्तीच्या लोकांना आणि गुंडांना दिला आहे. अशा लोकांना जेलमध्ये टाकण्याचे काम मी केले आहे आणि पुढेही करत राहीन. गुलाबराव पाटील विसरले असावेत की त्यांच्या आमदारकीच्या काळात मी त्यांना मोठी मदत केली होती. ते अजून राजकीयदृष्ट्या खूप लहान आहेत." मुक्ताईनगर नगरपंचायत निवडणुकीत शिवसेना आणि भाजपमध्ये मुख्य लढत झाली होती. यावेळी राष्ट्रवादीचे नेतृत्व करत असूनही खडसेंनी भाजपचा छुपा प्रचार केल्याची चर्चा होती.

## नाशिक-कर्नाटक संयुक्त तपासात मोठे विरोधाभास

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २५ :** तब्बल चारशे कोटी रुपयांच्या कथित रोख रकमेच्या कंटेनर लुटीप्रकरणी तपास जसजसा पुढे सरकतो आहे, तसतसं या प्रकरणातील गूढ अधिकच गंभीर होत चालले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांतील पोलिस यंत्रणा सध्या एकाच प्रकरणावरून वेगवेगळे दावे करत असल्याने संपूर्ण तपास प्रक्रियेत मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात आतापर्यंत सात संशयितांना अटक करण्यात आली असून, नाशिकमध्ये दाखल झालेले कर्नाटक पोलिसांचे विशेष पथक सध्या ताब्यात असलेल्या संशयितांची कसून चौकशी करत आहे. लूट नेमकी कशी झाली, कंटेनरमध्ये खरंच ४०० कोटींची रोकड होती का, आणि या कथित लुटीमागे नेमकी कोणती आंतरराज्यीय टोळी कार्यरत आहे, याचा छडा लावण्याचा प्रयत्न सुरू आहे.

गेल्या काही महिन्यांपूर्वी मुंबईहून नाशिकमार्गे कर्नाटककडे जाणाऱ्या एका कंटेनरची चोर्ला घाट परिसरात लूट झाल्याचा

### कथित ४०० कोटींची कंटेनर लूट

दावा करण्यात आला होता. या कथित घटनेनंतर महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू झाली. नाशिक ग्रामीण पोलिसांत संदीप पाटील याने दिलेल्या फियार्दीवरून इगतपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक ग्रामीण पोलिसांनी सुरुवातीला चौघांना अटक केली. त्यानंतर तपासाची दिशा बदलत गेली आणि जयपूर येथून विराट सतीश गांधी या संशयिताला ताब्यात घेण्यात आले. त्याला इगतपुरी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यास पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. पुढील तपासात आणखी संशयित निष्पन्न होत गेल्याने अटकांची संख्या सातवर पोहोचली आहे. मात्र, किशोर सावळा हा संशयित अद्यापही फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान, या प्रकरणाला नाट्यमय वळण देणारा मुद्दा म्हणजे कर्नाटक पोलिसांचा थेट नकार. बेळगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. व्ही. हिरेमठ यांनी चोर्ला घाट परिसरात ४०० कोटींच्या कंटेनर लुटीची कोणतीही घटना घडली नसल्याचे स्पष्टपणे सांगत, हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे. या परस्परविरोधी दाव्यांमुळे प्रकरणातील गूढ अधिकच वाढले आहे. एकीकडे नाशिक ग्रामीण पोलिस व कर्नाटक पोलिस संयुक्त तपास करत असताना, दुसरीकडे लूट घडलीच नसल्याचा कर्नाटक पोलिसांचा दावा अनेक प्रश्न उपस्थित करत आहे.

दरम्यान, बेळगाव जिल्ह्यातील खानापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक बिरादार आणि कमकेरी हे अधिकारी पथकासह नाशिकमध्ये दाखल झाले असून, ताब्यात असलेल्या संशयितांकडून कसून चौकशी सुरू आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास नाशिक ग्रामीण पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडे सोपवण्यात आला असून, ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांनी तपास सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे.

## आमचे नगरसेवक हरवले आहेत

### कल्याणमध्ये ठाकरे गटाच्या 'नॉट-रिचेबल' नगरसेवकांचे झळकले पोस्टर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ :**




कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सत्तेच्या चाव्या कुणाकडे जाणार याची चर्चा सुरू असतानाच, नगरसेवकांच्या पळवापळवीच्या संशयाने राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे गटाचे ११ उमेदवार निवडणुकीत विजयी झाले आहेत, मात्र त्यापैकी चार नगरसेवक १६ जानेवारीपासून बेपत्ता असल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून आता ठाकरे गट आक्रमक झाला असून कल्याण पूर्व परिसरात या नगरसेवकांचे "हरवले आहेत" अशा आशयाचे पोस्टर झळकवण्यात आले आहेत.

महापालिकेत आपला महापौर बसवण्यासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली असताना ठाकरे गटाचे चार शिलेदार अचानक गायब झाले आहेत. बेपत्ता झालेल्या नगरसेवकांमध्ये मधुर म्हात्रे, कीर्ती ढोणे, राहुल कोट आणि स्वप्नील केणे यांचा समावेश आहे. या विजयी उमेदवारांशी कोणताही संपर्क होत नसल्याने अखेर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कोळशेवाडी पोलिस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली आहे. मात्र, "तक्रार देऊनही पोलिस प्रशासन सुस्त असून, नगरसेवकांचा शोध घेण्यास टाळाटाळ केली जात आहे," असा गंभीर आरोप पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी केला आहे.

नगरसेवकांचा शोध घेण्यात पोलिस हलगर्जीपणा करत असल्याचा गंभीर आरोप ठाकरे गटाच्या नेत्यांनी केला आहे. खासदार संजय राऊत यांनी यावर कडक भूमिका घेत म्हटले आहे की, "आमच्या नगरसेवकांना दबावाखाली किंवा प्रलोभनाखाली पळवून नेले जात असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. पोलिसांनी तातडीने त्यांचा शोध घ्यावा, अन्यथा आम्हाला शिवसेना स्टाईलने कारवाई करावी लागेल."

## शिंदेच्या उमेदवारांना भाजपकडून 'एबी फॉर्म' फॉर्मचे वाटप

■ **धाराशीव :** राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असतानाच, धाराशिवमध्ये महायुतीमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. शिवसेनेच्या (शिंदे गट) उमेदवारांचे अधिकृत 'एबी फॉर्म' भाजप नेत्यांकडून वाटले जात असल्याचा गंभीर आरोप खुद्द शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनीच केला आहे. या प्रकारामुळे शिवसैनिकांमध्ये प्रचंड संताप असून, संपर्कप्रमुख राजन साळवी आणि पदाधिकारी अविनाश खापे यांच्यातील संभाषणाची एक ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाली आहे. या क्लिपने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. येत्या ३ फेब्रुवारीला धाराशिव जिल्हा परिषदेसाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या रणधुमाळीत शिवसेनेच्या उमेदवारांना पक्षाचे अधिकृत फॉर्म (एबी फॉर्म) मिळणे अपेक्षित होते.

### डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे प्रसूतीवेळी महिलेचा मृत्यू

## नातेवाइकांचा पोलिस ठाण्यासमोर ठिय्या

■ **वृत्तसंस्था,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. २५ :**

प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झालेल्या २५ वर्षांच्या महिलेचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याच्या आरोप करत नातेवाइकांनी शनिवारी (२४ जानेवारी) उस्मानपुरा पोलिस ठाण्यासमोर मृतदेह ठेवून ठिय्या आंदोलन केले. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यू झाला असून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी या वेळी करण्यात आली. हर्षीन हिना खालेद चाऊस (२५, रा. शहा कॉलनी, पीरबाजार, उस्मानपुरा) असे मृत महिलेचे नाव आहे. दरम्यान, यासंदर्भात संबंधित डॉक्टरांशी संपर्क साधला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

शहा कॉलनी भागातील रहिवासी खालेद चाऊस यांनी पत्नी हर्षीन हिना यांना २१ जानेवारी रोजी प्रसूतीसाठी उस्मानपुरा येथील छाबडा हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. दुपारी १ वाजता त्यांचे सिझेरियन झाले आणि त्यांनी एका मुलीला जन्म दिला. मात्र, त्यानंतर रक्तस्राव थांबत नसल्याने आणि प्रकृती खालावल्याने रुग्णाला नातेवाइकांना विश्वासात न घेता घाईघाईने अन्य रुग्णालयात हलवण्यात आले. उपचारांबाबत संशय, मृत्यूमुळे धक्का २१ तारखेपासून २३ जानेवारीपर्यंत एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू असताना डॉक्टरांनी प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले. मात्र, २३ तारखेला दुपारी अचानक हर्षीन यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर करण्यात आले.

### शासन स्तरावर सिंहस्थ कुंभमेळा कामांना चालना मिळत नसल्याने साधू महंतांकडून नाराजी

# त्रंबकेश्वर येथे कुंभमेळा बैठक घेण्याची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नाशिक, दि. २५ :**



त्र्यंबकेश्वर, सिंहस्थ कुंभमेळा कामांना चालना मिळत नसल्याने साधुमहंतांकडून जोरदार नाराजी आज येथे व्यक्त करण्यात आली. त्र्यंबकेश्वर मधील कुंभमेळ्यातील एक प्रमुख महंत शंकरानंद सरस्वती महाराज यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीला येथील दहा आखाड्यांचे प्रमुख महंत आश्रम धारी आणि कुटिया धारी साधू यांनी एकत्र येत प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तोंड सुख घेतले.

महंत शंकरानंद सरस्वती महाराज म्हणाले की, ऑक्टोबर मध्ये कुंभमेळ्याचे ध्वजारोहण होणार आहे असे असताना येथे कामे सुरू नाहीत. अधिकारी येतात आणि गोड गोड बोलून निघून जातात.प्रत्यक्षात कामांना चालणा नाही.आखाड्यात जी कामे सुरू होणार होती ती पाच कोटीची सुरू करावी अशी मागणी करण्यात आली असताना देखील एक कोटीची कामे होणार आहे. त्यातही कामे नगरपालिकाकडे देण्यात आल्याने आखाड्यांनी नाराजी व्यक्त करीत नगरपालिकेला कामे देण्याचा विरोध करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्र्यंबकेश्वर येथे तातडीने कुंभमेळा बैठक घ्यावी अशी मागणी केली. श्री पंचायती निरंजनी आखाड्याचे महंत धनंजय गिरी महाराज व ब्रह्मदर्शनाश्रमाचे महंत रामानंद सरस्वती महाराज म्हणाले की हरिद्वार आणि उज्जैन या ठिकाणी कुंभमेळा कामे आत्ताच सुरू आहे. परंतु त्र्यंबकेश्वरला कामे सुरू नाहीत. त्यामुळे आश्रम आणि साधू एकत्र आले असून सर्वांना सुविधा दिल्या पाहिजेत याकडे प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी केली. श्री पंचायती बडा उदासीन आखाड्याचे महंत दानमुनी म्हणाले की एप्रिल महिन्यापासून साधू महंत त्र्यंबकेश्वरला येणार आहेत. तत्पूर्वी ध्वजारोहणाला देखील साधू येतील. हिंदुत्ववादी सरकार त्र्यंबकेश्वरकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.नया उदासीन आखाड्याचे महंत गोपालदास म्हणाले की सर्वच कुंभमेळा क्षेत्रावर ज्याप्रमाणे लक्ष दिले जाते त्याप्रमाणे त्र्यंबकेश्वर मध्ये लक्ष दिले जात नाही. शासनाचे उदासीनता पाहता कुंभमेळा यशस्वी कसा होणार असा देखील प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रामकृष्ण आश्रमाचे विश्वरूपानंद महाराज म्हणाले की त्र्यंबकमध्ये ५० च्या वर विविध आखाड्यांचे आश्रम आहेत त्यांच्याकडे देखील भाविक येत असतात तिथे देखील सुविधा दिल्या पाहिजे असे ते म्हणाले.

जुना आखाड्याचे सहजानंद गिरी अग्नि या आखाड्याचे महंत दुर्गानंद ब्रह्मचारी व निर्मल आखाड्याचे महंत गुरु प्रीतसिंह महाकाली आश्रमाचे उदासीन बिंदू महाराज, सोमेश्वर आनंदाश्रमाचे महंत सिद्धेश्वरानंद सरस्वती महाराज, महंत प्रवीणनाथज महंत विवेकनाथ हे नाथ संप्रदायातील साधू तसेच सिताराम बाबा, कबूतर वाले निर्वाण श्रवण दाजी शुक्रपुरी जय देवगिरी साध्वी तसेच आवाहन आखाड्याचे क्रांतिगिरी महाराज इत्यादी उपस्थित होते. त्र्यंबकेश्वर येथे तातडीने कुंभमेळा बैठक घ्यावी अशी मागणी केली.

श्री पंचायती निरंजनी आखाड्याचे महंत धनंजय गिरी महाराज व ब्रह्मदर्शनाश्रमाचे महंत रामानंद सरस्वती महाराज म्हणाले की हरिद्वार आणि उज्जैन या ठिकाणी कुंभमेळा कामे आत्ताच सुरू आहे परंतु त्र्यंबकेश्वरला कामे सुरू नाहीत. त्यामुळे आश्रम आणि साधू एकत्र आले असून सर्वांना सुविधा दिल्या पाहिजेत याकडे प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी केली.

श्री पंचायती बडा उदासीन आखाड्याचे महंत दानमुनी म्हणाले की एप्रिल महिन्यापासून साधू महंत त्रंबकेश्वरला येणार आहेत तत्पूर्वी ध्वजारोहणाला देखील साधू येतील हिंदुत्ववादी सरकार त्र्यंबकेश्वर कडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.नया उदासीन आखाड्याचे महंत गोपालदास म्हणाले की सर्वच कुंभमेळा क्षेत्रावर ज्याप्रमाणे लक्ष दिले जाते त्याप्रमाणे त्र्यंबकेश्वर मध्ये लक्ष दिले जात नाही. शासनाचे उदासीनता पाहता कुंभमेळा यशस्वी कसा होणार असे देखील प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रामकृष्ण आश्रमाचे विश्वरूपानंद महाराज म्हणाले की त्र्यंबकमध्ये ५० च्या वर विविध आखाड्यांचे आश्रम आहेत त्यांच्याकडे देखील भाविक येत असतात तिथे देखील सुविधा दिल्या पाहिजे असे ते म्हणाले.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
**महासागर**
प्रिंट | ई-पेपर | डिजिटल | युट्यूब
सर्व काही एका छताखाली
**दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन, नागपूर पोस्ट (इंग्रजी) आणि संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म,**
महासागर मीडिया ग्रुप आज प्रिंटपासून डिजिटलपर्यंत सर्व माध्यमांत सक्षमपणे कार्यरत आहे.

**दररोज वाचनीय - दै. महासागर**
**दै. महासागर** हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ज्ञान, संस्कार, विचार आणि संवेदनशीलतेचा ५५ वर्षांचा अखंड प्रवास आहे. दररोज वाचनीय, माहितीने परिपूर्ण आणि सर्व वयोगटांना सामावून घेणाऱ्या नव्या, नव्या पुरवण्यांच्या माध्यमातून एक व्यक्ती नव्हे तर अवघं कुटुंब वाचावं, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.
**गेल्या ५५ वर्षांपासून सामाजिकतेचा वसा जपणारे दै. महासागर,** समाजप्रबोधन, शिक्षण, संस्कृती, आरोग्य, साहित्य आणि अध्यात्म या सर्वांचा संतुलित संगम साधत आहे. आपणही या वाचनसंस्कृतीचा भाग व्हावा, हीच आमची आपेक्षा.

**दर दिवशी विशेष वाचनीय पुरवणी दै. महासागर सोबत**

**सोमवार - कॅलिडोस्कोप**
विश्वनिर्मितीपासून ते नव्या शोधांपर्यंतचा प्रवास
या सदरातून वाचकांना विज्ञान, अंतराळ, निसर्ग, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या अद्भुत विश्वात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जातो. विश्वाची निर्मिती कशी झाली, पृथ्वीचे रहस्य, आधुनिक विज्ञानातील नवे शोध, AI, अंतराळ मोहिमा, सर्व काही सोप्या, समजेल अशा भाषेत.
• विद्यार्थ्यांपासून जिज्ञासू वाचकांपर्यंत सर्वांसाठी बौद्धिक मेजवानी.

**मंगळवार - जोश**
तरुणाईसाठी प्रेरणादायी ऊर्जा
फॅशन, फूड, करियर, यशकथा, स्टार्टअप्स, नवे ट्रेंड्स, आजच्या नव्या दमाच्या तरुणाईला जगण्यासाठी बळ देणारे सदर म्हणजे 'जोश'.
• अपयशातून उभे राहण्याच्या कथा, करियर मार्गदर्शन, आत्मविश्वास वाढवणारे लेख
• जीवनात "मीही करू शकतो" हा विश्वास निर्माण करणारे विचार

**बुधवार - निरामय**
चांगल्या आरोग्यासाठी खास मार्गदर्शन
आरोग्य ही खरी संपत्ती आहे, हेच या सदराचे सूत्र. दैनंदिन आरोग्य टिप्स, आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे व्यवहार्य आरोग्यज्ञान येथे मांडले जाते.
• आजारांपेक्षा आरोग्य जपण्यावर भर.

**गुरुवार - अस्मिता**
छंद, कौशल्य आणि नव्या निर्मितीचा शोध
माणूस केवळ नोकरीने नाही, तर त्याच्या छंदानेही जगतो.
लेखन, चित्रकला, संगीत, हस्तकला, फोटोग्राफी, उद्योजकता,
स्वतःमधील सुप्त कला ओळखण्यास मदत करणारे सदर.
• व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मसन्मान वाढवणारे लेखन.

**शुक्रवार - भक्ती मार्ग**
भक्ती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचा मार्ग
भक्तीचा मार्ग शेवटी सुखाकडे नेतो,
काय चांगले, काय वाईट, कर्म,कर्तव्य, देवाचा महिमा आणि माणूस म्हणून आपली जबाबदारी
या साऱ्यांवर चिंतन करणारे आध्यात्मिक सदर.
• मनाला शांतता, जीवनाला दिशा देणारे विचार.

**शनिवार - बालांगण**
लहानग्यांचे निरागस विश्व
मुलांना काय हवे आहे, काय नको
त्यांचे भावविश्व, शिक्षण, खेळ, संस्कार, पालकांसाठी मार्गदर्शन
या सर्वांचा समतोल साधणारे सदर.
• उद्याच्या पिढीचा विचार आजच.

**रविवार - साहित्य मैफिल**
शब्दांची, विचारांची आणि भावनांची मेजवानी
कविता, कथा, लेख, समीक्षा,भ्रमंती लाईव्ह स्टोरी सदर
नवोदित व प्रस्थापित लेखकांचे दर्जेदार साहित्य
दै. महासागरची साहित्यिक परंपरा जपणारे हे सदर.
• साहित्यप्रेमींना विचारांची समृद्धी देणारे व्यासपीठ.

**'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख**
दररोज ज्येष्ठ संपादक व विचारवंत **श्रीकृष्ण चांडक** यांचा **'खरीखरी'** हा विशेष अग्राग्रलेख दै. महासागरमध्ये नियमितपणे प्रसिद्ध होतो.दररोज स्वतःच्या नावाने अग्रलेख लिहिणारे ते राज्यातील पहिले वृत्तपत्र मालक, संचालक संपादक ठरले आहेत.'खरीखरी' या सदरातून ते कोणताही आडपडदा न ठेवता समाज, राजकारण, प्रशासन आणि लोकजीवनातील वास्तव मांडतात.सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस, अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे बोलण्याची ताकद, हेच या अग्राग्रलेखाचे वैशिष्ट्य आहे.

**दै. महासागर म्हणजे बातम्यांसोबत विचार, वाचनासोबत संस्कार आणि समाजासोबत आपुलकी दररोज वाचनीय, दररोज उपयुक्त.**

**ई-पेपर - महासागर मीडिया ग्रुप**
https://epaper.dainikmahasagar.in
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट (इंग्रजी) हे सर्व वृत्तपत्रे आता जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून, कुठेही आणि कधीही सहज वाचता येतात.
• आकर्षक आणि आधुनिक मांडणी
• एका क्लिकवर सर्व पेपर्स उपलब्ध
• मोबाईल, टॅब, लॅपटॉपवर सहज वाचन

**डिजिटल महासागर मीडिया ग्रुप**
https://dainikmahasagar.in
सर्व बातम्या एका ठिकाणी, सर्वांसाठी.
डिजिटल महासागरवर टाकलेली प्रत्येक बातमी लिंकच्या माध्यमातून तातडीने सर्वत्र पोहोचते.
• वेगवान आणि विश्वासार्ह बातम्या
• अपडेट्स रिअल टाइममध्ये
• काळ डिजिटलचा आहे आणि महासागरने त्यानुसार पुढचे पाऊल टाकले आहे.

**महासागर युट्यूब न्यूज चॅनल**
youtube.com / mahasagarnews
अनेक दर्जेदार शो, ग्राउंड रिपोर्टिंग, रोजच्या राजकीय-सामाजिक घडामोडी, महासागर मीडिया ग्रुपच्या सर्व लाईव्ह अपडेट्स आणि सेम टीव्हीच्या धर्तीवर उभे राहत असलेले डिजिटल व्हिडिओ साम्राज्य.
• लाईव्ह रिपोर्टिंग
• ग्राउंड रिॲलिटी
• लोकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ

**प्रिंटचा विश्वास, डिजिटलचा वेग आणि समाजासाठी पत्रकारिता.** **महासागर मीडिया ग्रुप** बातमी सर्व सामान्यांच्या मनातली.

# प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभात राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण उद्या, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता लालबहादुर शास्त्री



क्रीडांगण येथे होणार आहे.

त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : दि. २५ जानेवारी रोजी अकोला शासकीय विश्रामगृह येथे रात्री १० वा. आगमन व राखीव, मुक्काम.दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.०५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून प्रयाण, सकाळी ९.१४ वाजता लालबहादुर शास्त्री क्रीडांगण येथे आगमन व प्रजासत्ताक दिन समारंभ, ध्वजारोहण, संबोधन, कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम आदी कार्यक्रमांना उपस्थिती.

सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन व विविध कामांचा शुभारंभ, सोयीनुसार खाम गावकडे प्रयाण.

# निवडणूक यंत्रणेमध्ये अद्ययावत व सकारात्मक बदल
## अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
भारत निवडणूक आयोगाने नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून निवडणूक यंत्रणेमध्ये अद्ययावत आणि सकारात्मक बदल केले आहेत. मतदार नोंदणीसह विविध सुविधा एका क्लिकवर उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे 'माझा भारत माझे मत' हे ब्रीद सार्थ ठरत आहे, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी आज इथे केले.ते राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात बोलत होते.उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर, उपजिल्हाधिकारी (महसूल) निखिल खेमनार,अकोला तहसीलदार कुणाल झाल्टे आदी उपस्थित होते.कार्यक्रम ाच्या प्रारंभी मतदानाबाबत शपथ घेण्यात आली.श्री.गायकवाड म्हणाले की,मतदार नोंदणी, नावात दुरुस्ती,पत्ता बदल, मतदार ओळखपत्राची स्थिती तपासणे यांसारख्या सेवा आता ऑनलाइन उपलब्ध असल्यामुळे



सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.यामुळे पारदर्शकता वाढली असून निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.श्री. परंडेकर म्हणाले की,लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे अत्यंत आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने मतदाराला थेट मतदान केंद्रास्तरिय अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्यासाठी ‘ बुक अ कॉल विथ बीएलओ‘ यासह विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.कार्यक्रमात विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते.राष्ट्रीय मतदार दिन जनजागृती बाबत विद्यार्थ्यांनी भाषणे दिली. पथनाट्य सादर केले.यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.मतदान जनजागृती रांगोळी, वक्तृत्व,स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.तर नवमतदाराना प्रातिनिधिक स्वरूपात मतदान कार्डचे वितरण करण्यात आले.

### महापौर पदासाठी शिवसेना (उबाठा) कडून सुरेखा मंगेश काळे याचा उमेदवारी अर्ज दाखल

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
अकोला महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी शिवसेना (उबाठा) पक्षाकडून सुरेखा मंगेश काळे यांनी अधिकृतरीत्या उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हा अर्ज पिठासीन अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे.

अकोला महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा ३० जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, या सभेत महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवड प्रक्रिया पार पडणार आहे.

त्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगात सुरू आहे.

# अल्पवयीन मुलीला अमीष दाखवून पळविले

▪मुर्तिजापुर,दि.२५ (प्रतिनिधी)▪
मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत २३ जानेवारी रोजी सायंकाळी ४ ते ५.३० दरम्यान घडलेला प्रकार संपूर्ण परिसरात खळबळ उडवणारा ठरला. ग्राम किनी फनी येथे अल्पवयीन मुलीला प्रेम ाच्या बहाण्याखाली फूस लावून जबरदस्तीने पळवून नेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलीसांनी अप. नं. ३५/२५ अन्वये कलम १३७(२) इछड प्रमाणे गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

संशयित आरोपी सुरज विजय राठोड (रा. काटेपूर्णा, जि. अकोला) याला पिडीता आणि तिच्या कुटुंबीयांनी तातडीने ओळख दिली, आणि पोलीस तपासासाठी मैदानात उतरले आहेत. पो.उपनि. मनीषा सामटकर तपास करत असून घटनास्थळी साक्षीदारांची चौकशीही सुरू आहे. समाजाला सतर्क राहण्याची आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता या प्रकरणातून



स्पष्ट झाली आहे.हे प्रकार फक्त व्यक्तीच्या कृतीपुरते मर्यादित नाहीत; कायदा सतत जागृत आहे, आणि प्रेमाचा बहाणा वापरून केलेले गुन्हे ठिकठिकाणी उघड होतात. सामाजिक जागरूकता, शाळा, पालक आणि स्थानिक प्रशासन यांनी या प्रकारावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. मुलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक घटनेवर कडक कारवाई अपेक्षित आहे, आणि समाजाने अशा गुन्ह्यांना दडपशाही न करता थेट आव्हान द्यावे, हे या प्रकरणातून स्पष्ट दिसून येते.

# मुर्तिजापुर उडान पुलाखाली राँग साईडचा मृत्यूखेळ; ट्रकच्या धडकेत फोर्व्हीलरचा चक्काचूर

**स्थानिक ट्रॅफिक पोलिसांच्या कारवाईवर गंभीर प्रश्न**

**मुर्तिजापुर** : उडान पुलावरून खाली उतरणाऱ्या छक ५३ रस्त्यावर राँग साईडने चढणाऱ्या वाहनांचा धोका पुन्हा एकदा भीषण अपघातातून समोर आला. अजिंक्य पिपळे (वय २४, लकडगंज जुनी वस्ती) यांच्या आय-२० फोर्व्हीलरला चक १८ इन ३९५० क्रमांकाच्या ट्रक चालकाने भरधाव व निष्काळजीपणे धडक दिली. या धडकेत गाडीचे दोन्ही चाके, दरवाजे, बोनट व साइड ग्लास तुटून सुमारे दोन लाखांचे नुकसान झाले. घटना रात्री ७.३० वाजता घडली असून कलम २८१, ३२४(५) बीएनएस व १८४ मोटार वाहन अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विशेष म्हणजे उडान पुलावरून खाली उतरताना राँग साईडने चढणारी वाहने तसेच सर्व्हिस रोडवर उलट दिशेने धावणाऱ्या दुचाकी व चारचाकींची येथे नेहमीच घाईगर्दी असते. मात्र यावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक वाहतूक पोलिसांची ठोस कारवाई का दिसून येत नाही, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

### प्रजासत्ताक दिनानिमित्त अकोला जिल्हा पत्रकार संघातर्फे ध्वजारोहण सोहळा

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अकोला जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने सोमवार, दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता पत्रकार भवन, निमवाडी येथे ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या ध्वजवंदन कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व स्थानिक पत्रकारांनी आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन अकोला जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष व सरचिटणीस यांनी केले आहे. देशभक्ती, एकता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक असलेल्या प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा सोहळा पत्रकार बांधवांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

# पोलिसउपअधीक्षक गजानन शेळके यांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
जिल्हा जात पडताळणी विभागातील दक्षता पथकात कार्यरत असलेले पोलिस उपअधीक्षक गजानन शेळके यांना त्यांच्या उल्लेखनीय आणि आदर्श पोलिस सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर करण्यात आले आहे. हे पदक लवकरच मुंबई येथे मा. राज्यपाल महोदयांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.पोलिस सेवेत ३३ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या गजानन शेळके यांनी भंडारा, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम आदी जिल्ह्यांमध्ये विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. कायदा-सुव्यवस्था सांभाळतानाच समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात ते नेहमीच आघाडीवर राहिले आहेत.‘पोलिस मित्र’ संकल्पना, ‘एक कॉल करा, मदत मिळवा’, ‘नो मास्क नो सवारी’ यांसारख्या मोहिमा असोत किंवा फटाके फोडणाऱ्या बुलेट दुचाकींचे सायलेन्सर काढून ते रोड रोलरखाली



चिरडण्याची महाराष्ट्रात प्रथमच राबवलेली कारवाई, या सर्व मोहिमांनी त्याकाळात विशेष लक्ष वेधले होते. विशेषतः कोरोना काळात राबवलेली ‘नो मास्क नो सवारी’ मोहीम तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनीही प्रशंसनीय ठरवली होती.

## अकोला महापौर पदासाठी काँग्रेसकडून निखत शाहीन अफसर अहमद कुरेशी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪ महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी काँग्रेस पक्षाकडून निखत शाहीन अफसर अहमद कुरेशी यांनी अधिकृतरीत्या उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हा अर्ज पिठासीन अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे. अकोला महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा ३० जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, या सभेत महापौर व उपम हापौर पदासाठी निवड प्रक्रिया पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# महापालिका उपमहापौर पदासाठी भाजपाकडून चार उमेदवारी अर्ज दाखल

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी भारतीय जनता पक्षाकडून चार महिला नगरसेविकांची नावे अधिकृतरीत्या प्रस्तावित करण्यात आली आहेत.

पिठासीन अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे ही नावे सादर करण्यात आली असून, कल्पना गोटफफोळे, योगिता पावसाळे, शारदा खेळकर आणि वैशाली शेळके या चार नगरसेविका महापौर पदाच्या प्रमुख दावेदार ठरल्या आहेतअकोला महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा ३० जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, या सभेत महापौर व उपमहापौर पदासाठी निवड प्रक्रिया पार पडणार आहे.

त्या पार्श्वभूमीवर भाजपकडून इच्छुक उमेदवारांची नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.महिला नेतृत्वाला प्राधान्य देत तसेच ओबीसी प्रतिनिधित्वाला महत्त्व देण्याच्या दृष्टीने भाजपकडून चारही महिला नगरसेविकांची नावे पुढे करण्यात आल्याने, म हापौर निवडणुकीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

आता अंतिम निर्णय विशेष सभेत होणार असून, शहरातील राजकीय वतुर्ळाचे लक्ष या निवडीकडे लागले आहे.

## अकोला केमिकलच्या प्रदूषणाविरोधात
# प्रदूषण कार्यालया समोर गावकऱ्यांचे उपोषण सुरू

▪ सततच्या प्रदूषणामुळे गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात
▪ चौकशी व तपासणीनंतर कार्यवाहीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
स्थानिक एमआयडीसी परिसरातील अकोला केमिकल कंपनीच्या प्रदूषणामुळे शिवणी येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. याबाबत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जगदीश मुरूमकर यांनी अकोला प्रदूषण नियंत्रण मंडळाला यापूर्वी तक्रारी दिल्या होत्या. परंतु ठोस कार्यवाही करण्यात न आल्या मुळे शिवणी, शिवर, व कुंभारी येथील नागरिकांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अकोला कार्यालयासमोर २३ जानेवारीपासून उपोषण प्रारंभ केले आहे.

एमआयडीसी परिसरातील अकोला केमिकल कंपनीमधून निघणाऱ्या वायू व द्रवामुळे शिवणी परिसरातील हवा प्रदूषित झाली आहे. तसेच जमिनीखालील पाणी सुद्धा प्रदूषित झाले आहे. याबाबत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जगदीश मुरूमकर यांनी अकोला प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयाकडे तक्रार दाखल केली होती. त्यावर थातूरमातूर कार्यवाही करून ठोस कार्यवाहीचे आश्वासन देण्यात आले होते.




परंतु अद्याप पर्यंत ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे २३ जानेवारीपासून जगदीश मुरूमकर यांचेसह शिवणी, शिवर, कुंभारी येथील नागरिकांनी अकोला प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण प्रारंभ केले. या उपोषणाची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित तक्रारीनुसार चौकशी व तपासणी करून अहवाल तयार केला. हा अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात आला. विभागीय कार्यालयाकडून तातडीने कार्यवाही करून संबंधित कंपनी बंद करण्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याची माहिती अकोला प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयाकडून उपोषण कर्त्यांना देण्यात आली.आता प्रस्तावानुसार जो पर्यंत कार्यवाही होत तो पर्यंत उपोषण सुरू राहणार असून ते अधिक तीव्र करणार असल्याचा इशारा जगदीश मुरूमकार यांनी दिला.या उपोषणात सुरेश मुरूमकार,सचिन शिरसाट आदी सहभागी आहेत.

# फडके नगरच्या किर्तन उत्सवाची निघाली भव्य शोभायात्रा

▪अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)▪
स्थानिय फडके नगर येथील हनुमान मंदिर उत्सव समितीच्या वतीने संगीतमय रामायण व कीर्तन सप्ताहाच्या समाप्तीच्या पूर्व संधेवर रविवारी दाबकी रोड परिसरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली.फळके नगरातील हनुमान मंदिरापासून भजनी दिंड्या, आकर्षक बग्गी समवेत ही शोभायात्रा डाबकी रोड,गोडबोले प्लॉट,कर्ता हनुमान मंदिर परिसर, वानखडे नगर आदी परिसरात म ार्गक्रमण करीत या शोभायात्रेचे परत फडके नगरातील हनुमान मंदिरच्या उत्सव प्रांगणात मोठ्या भक्तिभावात समापण करण्यात आले. या शोभायात्रेत महिलांनी फेटे घालून पारंपरिक वेषात डोक्यावर तुळस घेऊन या शोभायात्रेत सहभाग घेतला.यावेळी यजमान संतोष घोगरे व सौ अनुराधा घोगरेयांनी भागवत डोक्यावर धारण करीत भागवतकार हभप सुभाष म हाराज चव्हाण यांच्या उपस्थितीत शोभायात्रेत मोठ्या भक्तिभावात सहभाग घेतला. यावेळी



परिसरातील नागरिकांनी आपल्या दारासमोर भव्य दिव्य रांगोळ्या काढून उस्फूर्तपणे या शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत केले.

आज दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हभप हभप तुकाराम महाराज सखाराम पुरकर इलोरा यांच्या काल्याच्या कीर्तनाने या कीर्तन उत्सवाचा भक्तिभावात समारोप करण्यात येणार आहे.या गोपाल काल्याच्या कीर्तन उत्सवात महिला पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मेजर रामरतन बुडूकले, हरिभाऊ चितोळे,मनोहर खरपकर, रमेश खोटरे, नारायणराव गावंडे,प्रकाश चौधरी, मनोज गायकवाड, संतोष घोगरे, बाबूलाल चौधरी, प्रभू इंगळे, लता बुडूकले, आशा खरपकर,अनुराधा घोगरे, मनीषा गावंडे, राधा खेडकर, प्रीती खरपकर, उज्वला चौधरी, सारिका जूनगडे, ज्योती अकोटकर, जया जकाते समवेत

हनुमान मंदिर उत्सव समिती,महीला समिती, हरिपाठ समिती,भोजन समिती,व फडके नगरच्या समस्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.



# हे विचार साहित्य संमेलन नवी पिढी घडवणारे : प्रा. विजयाताई मारोतकर

## १२ व्या राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलनाचे थाटात उदघाट्न

■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)■

राष्ट्रसंतांचा विचार जनसामान्यांच्या भाषेत सांगितलेले तत्त्वज्ञान होय. विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून मानवाच्या कल्याणासाठी त्यांनी साहित्य लिहिले. हाच धागा पकडून साहित्यिकांनी साहित्य निर्मिती केली पाहिजे. आधुनिक विचाराचा धागा घेऊन राष्ट्रसंतांनी ग्रामगीता लिहिली.

आता याचे पारायण होण्यापेक्षा कृतिशील झालं पाहिजे आणि हाच विचार नव्या पिढीसमोर मांडण्याचे मोठे कार्य या विचार साहित्य संमेलनच्या माध्यमातून होत आहे आणि नवी पिढी घडवण्याचे काम यामध्यम ातून होत असल्याचे प्रतिपादन संमेलनाध्यक्षा प्रा. विजयाताई मारोतकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.




वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने १२ वे राज्यस्तरीय राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलनाचे उदघाट्न रविवारी थाटात पार पडले. यावेळी विचार साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षा जेष्ठ साहित्यिक तथा सामाजिक कार्यकर्त्या प्रा विजयाताई मारोतकर ह्या होत्या. तर स्वागताध्यक्ष प्रा. प्रकाश डवले हे होते तर उदघाटक म्हणून विचार साहित्य संमेलनाचे मुख्य मार्गदर्शक आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून शेतकरी नेते तथा जेष्ठ संपादक प्रकाश पोहरे, ग्रामगिता प्रचारक ज्ञानेश्वरजी रक्षक, डॉ. ममताताई इंगोले, आजीवन प्रचारक मनोहरदादा रेचे, सुनील दशमुखे, डॉ. गजानन काकड, जेष्ठ रंगकर्मी अशोक ढेरे, मराठा सेवा संघांचे प्रदीप चोरे, सेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. प्रकाश मानकर, प्रशांत सेवतकर, सेवा समितीचे अध्यक्ष गोपाल गाडगे, सचिव डॉ. रामेश्वर बरगट, समाजसेवक गुणवंतराव जानोरकर आदी मान्यवर उपस्थित होते. विजय वाहोकार व अतुल डोंगरे यांनी सादर केलेल्या संकल्गीताने संमेलनाची सुरुवात झालीसंमेलनाचे प्रास्ताविक समितीचे सचिव डॉ. रामेश्वर बरगट यानी केले.स्वागतध्यक्ष प्रकाश डवले यानी मनोगत व्यक्त करीत राष्ट्रसंतांच्या विचाराची गरज असल्याचे प्रतिपादन केले. आचार्य वेरूळकर गुरुजी यांनी मनोगत व्यक्त करीत उदघाट्न झाल्याचे जाहीर केले. तदनंतर ज्ञानेश्वर रक्षक, प्रकाश पोहरे यानी मनोगत व्यक्त केले. संचालन ऍड. सचिन मोहोकार यानी तर आभार समितीचे कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर साकारकर यानी केले.


### उपमहापौर पदासाठी वंचित बहुजन आघाडीकडून पराग गवई यांचा उमेदवारी अर्ज दाखल



■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)■

महानगरपालिकेच्या उपमहापौर पदासाठी वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून नगरसेवक पराग गवई यांनी अधिकृतरीत्या उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हा अर्ज पिठासीन अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे.अकोला महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा ३० जानेवारी २०२६ रोजी होणार असून, या सभेत महापौर व उपमहापौर पदासाठी निवड प्रक्रिया पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगात सुरू आहे.

## मराठा पाटील समाज संवाद पदयात्रेचा आज वाडेगावात भव्य समारोप




■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)■

मराठा पाटील समाजात वैचारिक प्रबोधन, सामाजिक संवाद आणि एकतेची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित मराठा पाटील समाज संवाद पदयात्रेचा आज प्रजासत्ताक दिनी , २६ जानेवारी २०२६ रोजी वाडेगाव येथे भव्य व प्रेरणादायी समारोप होत आहे.ही संवाद पदयात्रा स्व. राजदत्त गुरुदत्त मानकर, संस्थापक अध्यक्ष, मराठा पाटील समाज संघ तालुका बाळापूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आली असून, १७ जानेवारी २०२६ रोजी काजीखेड येथून तिचा प्रारंभ झाला. तालुक्यातील विविध गावांतून मार्गक्रमण करत समाजातील प्रश्न, अपेक्षा, अडचणी व उपायांवर संवाद साधत ही पदयात्रा आज वाडेगाव येथे दाखल होत आहे.

आज सकाळी ९.०० वाजता योगेश पाटील भटकर यांच्या निवासस्थानावरून टाळ–मृदुंगाच्या गजरात, वारकरी परंपरेची अनुभूती देणारी संवाद पदयात्रा (दिंडी) वाडेगावच्या प्रमुख मार्गांवरून निघणार असून, तिचा समारोप श्री जागेश्वर मंदिर, वाडेगाव येथे होणार आहे.स्व. राजदत्त मानकर यांच्या प्रथम जयंती दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात समाजातील सर्व स्तरांतील बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या संवेदना व्यक्त कराव्यात, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. समाजहितासाठी अखंड कार्यरत असलेल्या स्व. मानकर यांच्या विचारांना आणि कार्याला ही पदयात्रा एक भावपूर्ण मानवंदना ठरत आहे.समारोप कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून, हा कार्यक्रम सम ाजबंध अधिक दृढ करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

हा समारोप सोहळा यशस्वी करण्यासाठी सम स्त पाटील समाज, वाडेगाव परिश्रम घेत असून, समाजातील सर्व बांधवांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन मराठा पाटील संघाचे तालुका अध्यक्ष शरद वानखडे यांनी केले आहे.

## रहस्मरित्या निघुन गेलेल्या २ मुलांना खदान पोलीसांनी १४ दिवसानंतर पुणे येथुन घेतले ताब्यात

■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)■

१०/०१/२०२६ रोजी पोलीस स्टेशन खदान जि. अकोला येथे फिर्यादी मोतीराम गजानन तेंलग वय २७ वर्ष रा. नादरुण ता. दर्यापुर जि. अमरावती यांनी तक्रार दिली की, ते सुरक्षा रक्षक म्हणुन बाल निरीक्षण गृह व बालगृह, अकोला संतोषी माता मंदिराच्या मागे हनुमान वस्ती अकोला येथे नेमणुकीस असुन सदर बालगृहामध्ये दाखल असलेले दोन विद्यार्थी १) तुषार पुरुषोत्तम वडणे वय १० वर्ष २) सुशांत योगेश बांगर वय ११ वर्ष हे सकाळी ०७/०० वा. सरस्वती विद्यालय, मलकापुर येथील शाळेमध्ये गेले होते परंतु शाळा सुटल्यानंतर सुध्दा बाल निरीक्षण गृह व बालगृह अकोला येथे परत आले नाही आजुबाजुला तसेच अकोला शहरात शोध घेतुला मिळुन आले नाही वरून पोलीस स्टेशन खदान येथे अप नं २६/२०२६ कलम १३७ (२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.सदर गुन्हयांमधील अल्पवयीन मुलांचा पोलीस स्टेशन खदान येथील अंम लदार शोध घेत असतांना अल्पवयीन मुलांचे आई–वडील व नातेवाईकांनी मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांची भेट



घेतली असता मा. पोलीस अधीक्षक मा. श्री. अर्चित चांडक यांनी गुन्हयांमधील दोन्ही मुले ही अल्पवयीन असल्याने ऑपरेशन मुस्कान अंर्तगत ०४ पथके निर्माण करण्याचे आदेश दिले. ज्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी शहर विभाग अकोला यांचे अधिपत्याखाली एक पथक, स्थानिक गुन्हे शाखा येथील एक पथक व दोन पथक पोलीस स्टेशन खदान स्तरावर तयार करून दोन्ही मुलांचे शोध घेणेकामी चारही पथके कामाला लागली होती. दोन्ही अल्पवयीन मुलांकडे मोबाईल नसल्यामुळे त्यांचे शोध घेणे आव्हानात्मक झाले होते, तरी सुध्दा चारही पथकामधील अधिकारी / अंमलदार यांनी मागील १४ दिवसांपासुन सतत अम रावती, अकोला, वाशिम, जळगाव, शेगांव, छत्रपती संभाजीनगर, पुणे असे एकुण ०७ जिल्हयात दिवस–रात्र मेहनत करून १२०० कि.मी चा प्रवास करून सतत दोन्ही मुलांचा शोध घेवुन, वेगवेगळया ठिकाणाचे शेकडो सी.सी.टी.व्ही तपासुन, अनेक नागरीकांची व दोन्ही मूलांचे नातेवाईकांची भेट घेवुन प्रत्येक जिल्हयामधील व तालुक्यामधील बसस्टॅण्ड, रेल्वे स्टेशन येथे जावुन तेथे दोन्ही बेपत्ता मुलांचे नागरीकांना फोटो दाखवुन व दोन्ही मुलांचे गुमशुदा की तलाश या माथळयाखाली स्टीकर तयार करून ते संपुर्ण महाराष्ट्र व भारतभर प्रसारित करून तसेच रसत्यावरील अनेक नागरीकांना भेटुन त्यांना दोन्ही मुलांबाबत विचारपुस करून अखेर सदर गुन्हयांमधील बेपत्ता असलेले अल्पवयीन मुले १) तुषार पुरुषोत्तम वडणे वय १० वर्ष २) सुशांत योगेश बांगर वय ११ वर्ष यांना पुणे येथुन सुखरूप ताब्यात घेतले.

## न्याय मिळण्यासाठी शेतकऱ्यांने थेट पंतप्रधानांना पाठविले पत्र पंतप्रधान कार्यालयाकडून चौकशी चे आदेश

### दहीहांडा पोलीसांनी केली प्रकरणाची चौकशी

■कुटासा,दि.२५ (प्रतिनिधी)■

शेतजमिनीचे क्षेत्रफळ प्रशासनाने कमी दाखविल्यामुळे अन्याय झालेल्या देवरी येथील शेतकरी हरिदास गणपतराव पातुर्डे यांनी थेट पंतप्रधानांना पत्र पाठविले. त्यावर पंतप्रधान कार्यालयाने चौकशी करण्याचे आदेश दिल्यामुळे खळबळ उडाली आहे. मला न्याय न मिळाल्यास २६ जानेवारीनंतर बेमुदत उपोषण करेल,असा इशारा दिल्यामुळे दहीहांडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार कर्मचाऱ्यांसह शेतकऱ्याच्या घरी पोहोचून शेतकऱ्याचे नेमके प्रकरण काय ते समजून घेतले.

माझ्या वडिलांची शेती बळेगाव (शेत स.नं. १०७, १०८) मध्ये आहे. परंतु स. नं. १०७ मध्ये मंडळ अधिकाऱ्यांनी चुकीचा फ ेरफारघेऊन घोळकेला. त्यानंतर सन १९७९ मध्ये भूमी अभिलेख विभागाने एकत्रीकरण राबविले, तेव्हा सुध्दा घोळ करण्यात आला. त्यामुळे मी वारंवार संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत आजवर न्याय मागत आलो आहे. मात्र बरेच वर्ष उलटून गेल्यानंतरही आतापर्यंत मला न्याय मिळालेला नाही. दरम्यान भूमी अभिलेख अमरावती प्रदेश अमरावती येथे कार्यरत महिला कर्मचाऱ्याने सुध्दा केवळ एवढा पत्रव्यवहार व खटाटोप का २७ आरचा फरक आहे, त्यामुळे करता, असे उर्मट उत्तर दिले. त्यामुळे आपणाला न्याय द्यावा, अशी मागणी सदर शेतकऱ्याने पंतप्रधानांकडे पत्राव्दारे केली होती.दरम्यान या पत्रावर पंतप्रधान कार्यालयाने महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांना पत्र देऊन यासंदर्भात चौकशीचे आदेश दिले. न्याय मिळत नसल्यामुळे हताश झालेल्या देवरीच्या या शेतकऱ्याने उचललेल्या पवित्र्यामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली.दरम्यान शेतकरी हरिदास पातुर्डे यांच्या घरी दहीहांडा पोलिसांनी धाव घेत त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. देवरी येथील शेतकरी पातुर्डे यांच्याशी संपर्क साधला असता माझ्या मागण्यापूर्ण न झाल्यास मी उपोषणावर ठाम असल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधी शी बोलताना सांगितले.

### हिदायत पटेल खून प्रकरणातील दुसरा आरोपीही तुरूंगात

अकोट : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांच्या खून प्रकरणात अटक करण्यात आलेला दुसरा आरोपी अब्दुल अन्सार अब्दुल गफ्फार (४२) रा. इफ्तेखार प्लॉट अकोट याची शनिवारी पोलिस कोठडी संपल्यानंतर त्याला न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

## शिवर येथे गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत

अकोला :अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कोळंबी येथून निघालेल्या श्री गजानन महाराजांच्या पालखीचे शिवर येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री हनुमान मंदिरात २० जानेवारी २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावात व उत्साहात स्वागत करण्यात आले. पालखी शिवर नगरीत दाखल होताच टाळ मृदंगाच्या गजराने व जय जय गजानन महाराज या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी श्री गजानन महाराजांच्या मूर्तिचे विधीवत व विविध पूजन करण्यात आले. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती. याप्रसंगी सामूहिक आरती संपन्न झाली. पायदळ वारीतसहभागी झालेल्या भाविकांसाठी अमीत ठाकरे व त्यांच्या परिवाराच्या वतीने अल्पोपहाराचे वितरण करण्यात आले. तसेच श्री गजानन महाराज पायदळ वारी समितीच्या वतीने ठाकरे परिवाराचा सत्कार करण्यात आला.

## 'उमंग' सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचे धडे

■पातुर,दि.२५ (प्रतिनिधी)■

डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्राम ीण आयुर्वेद महाविद्यालय, पातूर येथे आयोजित ङ्गउमंगङ्ख या सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांना जीवन कसे जगावे, अपयशाशी कसे लढावे आणि स्वतःची वेगळी ओळख कशी निर्माण करावी, याबाबत मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास माजी महिला अध्यक्ष व म हाराष्ट्र राज्य सदस्य आशाताई मिरगे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगितले की, जीवनात कधीही इतरांशी तुलना करू नये. प्रत्येक व्यक्तीची जागा वेगळी असते. आपल्याला जे योग्य



वाटते, ते प्रामाणिकपणे करणे महत्त्वाचे आहे. तुलनात्मक धोरणामुळे जीवनात असमाधान निर्माण होते, असे त्यांनी स्पष्ट केले.दुसरे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. हर्षवर्धन मालोकार यांनी आपल्या विद्यार्थी जीवनातील आठवणी सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. जीवनात अपयश आले तरी खचून जाऊ नका.

## चोहोट्टा बाजार येथे एक्का बादशहा जुगारावर पोलिसांची कारवाई

### ३६ हजाराचा मुद्देमाल जप्त ६ जन ताब्यात

■कुटासा,दि.२५ (प्रतिनिधी)■

अकोट तालुक्यातील चोहोट्टा बाजार परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांनी मोठी कारवाई करत 'एक्का बादशाहा' चार्टवर सुरू असलेला जुगार उध्वस्त केला आहे. या कारवाईत सहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून तब्बल ३६ हजार ६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई शुक्रवार, २४ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अकोट यांच्या मार्गदर्शनाखाली दहीहांडा पोलीस ठाणे व चोहोट्टा बाजार चौकीच्या पथकाने संयुक्त कारवाई केली. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मागील बाजूस असलेल्या वडाच्या झाडाखाली सार्वजनिक ठिकाणी जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी धाड टाकली. छाप्यात हर्षल रघुनाथ खेडकर (रा. चोहोट्टा बाजार) हा जुगार चालवत असल्याचे आढळून आले. त्याच्यासह जुगार खेळणारे ज्ञानेश्वर पिंपरे (कुटासा), बाळकृष्ण कोलटक्के (रेल), गोवर्धन वानखडे (कावसा), केशव नरवाडे (चोहोट्टा बाजार) आणि बाळकृष्ण मातुरकर (टाकळी) यांना ताब्यात घेण्यात आले. काही जण घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले.

## जगत कल्याणासाठी भागवत–माता चैतन्य मीरा गोरक्षण रोड परिसरात निघाली कलश यात्रा

■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)■

भागवतची रचना ही जगातील सर्व जीवांच्या कल्याणासाठी झाली आहे.भागवत श्रावणाने जिवांचे कल्याण होऊन शाश्वत सुखाची प्राप्ती होते. म्हणून सर्वांनी नित्य भागवत श्रवण करण्याचा हितोपदेश माता चैतन्य मीरा यांनी केला. श्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृती प्रचार परिषद अकोला तथा श्री भागवत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान येथे रविवार पासून सुरू झालेल्या श्रीमद भागवत कथेचे प्रथम पुष्प माता चैतन्य मीरा यांनी गुंफले.मंगलाचरण व भागवताचे प्रास्तविक करतांना त्यांनी भागवताची रचना व तिचा मुख्य उद्देश याचे सारगर्भित वर्णन केले. दरम्यान कथा प्रारंभी भागवत प्रवचनकार माँ चैतन्य मीरा यांच्या उपस्थितीत शुभमंगल सभागृहातुन कथास्थळ पर्यंत कलश शोभायात्रा काढण्यात आली.अनेक मातृशक्तीनी डोक्यावर कलश घेऊन यात सहभाग घेतला. सर्वप्रथम रुहाटीया परिवार



व सोनालावला परिवारने मातेचे पूजन केले.सीए बी एम अग्रवाल यांनी मातेचा परिचय करून दिला.आरतीने या कथेचा प्रारंभ करण्यात आला.दि ३१ जानेवारी पर्यंत दु ३ ते साय ७ वाजेपर्यंत आयोजित या भागवत कथा श्रवणाचा महिला पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन दीपक भरतीया, श्रीप्रकाश रुहाटीया,महेश खंडेलवाल, राजीव बजाज, सुशील खोवाल,संजय अग्रवाल, शैलेंद्र कागलीवाल, सीए बीएम अग्रवाल, शंकर सेठ,किशोर अग्रवाल, पन्नालाल भूतडा, विक्रम गोयनका, संजय तुलशान, गोपाल एस अग्रवाल, अशोक अग्रवाल, सुरेश खंडेलवाल, सुरेश सुरेका,प्रकाश बजाज, प्रेमप्रकाश खेमका, शंकरलाल बियाणी,हेमेंद्र अग्रवाल,शिवप्रकाश मंत्री, मनोज अग्रवाल,अरविंद अग्रवाल,रितेश खेतान, शरद चांडक,अशोक धानुका, शिव भगवान भाला, कमलकिशोर वर्मा, हेमेंद्र राजगुरू मुकेश गुप्ता, निरंजन अग्रवाल सहभागी झाले होते.

### रेल्वेचा ब्लॉक; नाशिक– बडनेरा मेमूसह काही गाड्या रद्द!

**अकोला :** भुसावळ विभागातील भुसावळ – बडनेरा रेल्वे विभाग अंतर्गत येणाऱ्या जलंब रेल्वे स्थानकावर 'डाउनलूप लाईन'च्या विस्तारासाठी तसेच इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी यार्ड रिमॉडेलिंग आणि नॉन इंटरलॉकिंगचे कार्य हाती घेण्यात येत आहे. या कार्यासाठी काही प्रवासी गाड्यांच्या वेळेत तात्पुरते बदल, नियमन तसेच काही गाड्या रद्द करण्यात येत आहेत. दरम्यान, ३० जानेवारी रोजी प्रभावित होणाऱ्या गाड्यांमध्ये भुसावळ–बडनेरा मेमू रद्द करण्यात आली आहे. तसेचबडनेरा–भुसावळ मेमू, भुसावळ–वर्धा एक्सप्रेस, वर्धा–भुसावळ एक्सप्रेस, बडनेरा – नाशिक रोड विशेष या गाडी ३१ जानेवारी रोजी रद्द राहणार आहेत. नाशिकरोड – बडनेराविशेष २९जानेवारीली रद्द राहिल.विभागामध्ये गाड्यांचे नियमनानुसार अजमेर –पुरी एक्सप्रेस विभागात २.३० तास नियमन करण्यात येतील. अम्ब अन्दौरा – हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस विभागात २ तास नियमन करण्यात येतील.

## अखेर प्रशासनाकडून चौकशी समिती गठीत

### उपसरपंचांचे आमरण उपोषण अखेर स्थगित



■अकोला,दि.२५ (प्रतिनिधी)■

अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे ग्रामपंचायतीम धील विकासकामे आणि प्रशासकीय कामकाजात झालेल्या कथित अनियमिततेमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ग्रामपंचायत अधिकारी विद्या हेमंत वाघ यांच्या कार्यकाळातील कामांच्या चौकशीसाठी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौ. अर्चना गजानन चोपडे यांनी २४ जानेवारी २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आम रण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषद प्रशासनाने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून एक उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली आहे. त्यामुळे नियोजित उपोषण स्थगित करण्यात आले आहे. उपसरपंच अर्चना चोपडे यांनी १२ जानेवारी रोजी ग्रामसेवक (ग्रामपंचायत अधिकारी) यांच्या कार्यकाळातील कामांमध्ये मोठ्या प्रमाणात धांधली झाल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली होती. जर या कामांची निष्पक्ष चौकशी झाली नाही, तर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला होता. मात्र, प्रशासनाकडून वेळेत ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी शनिवारपासून आपले आंदोलन सुरू केले.६ सदस्यीय विशेष समिती करणार चौकशी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद, अकोला) यांनी या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी एक विस्तृत समिती गठीत केली आहे.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक
स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# प्रजासत्ताक, प्रजेची सत्ता आणि सत्य..

आपण सत्तेहत्तरावा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. प्रजासत्ताक दिन जरी आपण दरवर्षी साजरा करत असलो तरीही अजूनही देशातील नव्वद टक्के पेक्षा जास्त लोकांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, पार्श्वभूमी, आणि गांभीर्यच नाही. हि केवळ शोकांतिका नाही तर आपण स्वतःला कितीही हुशार, बुद्धिमान व सुशिक्षित समजत असलो तरीही प्रजासत्ताक दिन, संविधान आणि देश याबाबत आपली अक्कल, आपले विचार शुन्य असुन आपला मेंदू विकसित झाला नसल्याचे हे प्रमाण आहे. स्वतःला सुशिक्षित, विद्वान समजणाऱ्यांना जर संविधान, प्रजासत्ताक आणि देश हे जर समजत नसेल, याबाबत जागृती नसेल तर ती विद्वत्ता आणि ते शिक्षण कोणत्याही कामाचे नसुन तो असणारा केवळ बौद्धिक मतीमंद व्यक्ती होय. बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिवस म्हणजे सुट्टीचा दिवस वाटतो तर बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिन म्हणजे झेंडा दिवस वाटतो. शाळेत किंवा जिथे कुठे प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो त्या ठिकाणी प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ, प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व व त्याचे फायदे यावर कधीच सखोल आणि निष्पक्ष चर्चा वा प्रबोधन झालेच नाही. स्वतःला सुशिक्षित व विद्वान समजणाऱ्या लोकांना जर प्रजासत्ताक दिनाचा अर्थ व महत्त्व कळत नसेल तर आपले शिक्षण व विद्वत्ता कोणत्या गुणवत्तेची आहे हे तपासणे आवश्यक आहे. स्वंयघोषित सुशिक्षित व विद्वान हा उल्लेख वारंवार यासाठी करावा लागत आहे की याच लोकांची बौद्धिक पातळी अशी असेल तर गाव खेड्यातील अडाणी आणि कष्टकरी जनतेला प्रजासत्ताक दिन व त्याचे गांभीर्य कसे कळेल? त्यांना प्रजासत्ताक चा खरा अर्थ कोण सांगणार? प्रजासत्ताक देशामध्ये अडाणी, कष्टकरी गाव खेड्यात राहणाऱ्या लोकांचे काय स्थान आहे? प्रजासत्ताक व्यवस्थेचा खरचं तळागाळातील लोकांना फायदा झाला का? असे अनेक प्रश्न आहेत ज्यावर चर्चा, संमेलन व जागृती होणे गरजेचे आहे. केवळ शहीदांचे गाणे लाऊन देशभक्तीचा देखावा करता येत नाही. जिवाची बाजी लावून ब्रिटीशांच्या तावडीतून देशाला स्वातंत्र्य करताना जे जवान शहिद झाले, ज्यांनी आपले आयुष्य भारतीयांना हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी, देशाचा विकास होण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले त्यांचे स्मरण करण्याचा दिवस अर्थात पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करतो. परंतु प्रजासत्ताक दिनी शहिदांचे गाणे लाऊन लोकांना भावनिक करून मुळ मुद्यावरून लक्ष विचलित करून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व लोकांना कळूच नये अशी रितसर व्यवस्था केली जाते. प्रजासत्ताक दिनी चर्चा व्हायला पाहिजे ती संविधानावर, संविधान निर्माण करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर. पण आजही संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही घेण्याचे धाडस येथील विकृत व बौद्धिक कमकुवत लोकांकडून होत नाही. याचे कारण ते कितीही शिकलेले असतील तरीही त्यांच्या मेंदुचा विकासच झालेला नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान हे देशाचे आहे. संविधानावर देश चालतो, संविधान निर्माण झाले म्हणून प्रजासत्ताक दिन आपण साजरा करतो. देशाचे सर्वोच्च असलेले संविधान आजही काही लोक विशिष्ट लोकांचे संविधान आहे असे समजून संविधान वाचत नाहीत, घरात आणत नाहीत म्हणजे किती ही बौद्धिक दिवाळखोरी आहे. संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून कित्येक लोक संविधान घरात आणत नाहीत अशा मानसिकतेच्या लोकांना कसे विद्वान म्हणता येईल. मोठमोठ्या महाविद्यालयात शिकून, अंगावर पांढरे कपडे घालून आणि लाखात पगार घेणे म्हणजे हुशार किंवा सुशिक्षित आहे असे मुळीच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धांचे आहेत म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर नाकारणारे लोक बौद्धिक दरिद्री तर आहेतच पण देशद्रोही आणि धर्मद्रोही सुद्धां आहेत. कारण संविधान हे देशाचे आहे. आणि भारतीय माणसाने भारतचे संविधान लिहले. आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा संविधान लिहले तेव्हा ते हिंदूच होते. जगातील सर्वात मोठा विद्वान तत्कालीन हिंदू, जगातील सर्वोच्च संविधान ही बाब हिंदू धर्मीयांसाठी धर्माचा व्यक्ती म्हणून आणि जगात सर्वात सुंदर संविधान लिहले म्हणून देशाचे नागरिक म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करणे किती गौरवाची बाब आहे. पण हे ज्यालाच कळेल जो खरा धर्माचा आणि खरा देशाचा आहे. बरेच लोक म्हणतात संविधान बदलायला पाहिजे. का बदलायला पाहिजे तर केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले, त्यातील बराचसा भाग इतर देशाकडून घेतलेला आहे वगैरे वगैरे बोलुन स्वतः ची अक्कल पाजळत बसतात. पण ते हे करतांना आपल्याच धर्मातील तत्कालीन विद्वान आणि हुशार दोनशे चौऱ्यांशी लोकांनी संविधान देशाच्या वतीने स्विकृत केले म्हणजे आजचे स्वयंघोषित विद्वान त्या दोनशे चौऱ्यांशी लोकांच्या देशभक्ती वर व विद्वतेवर प्रश्नच निर्माण करत नाहीत तर त्यांची विद्वत्ता झूगारून लावतात. त्या स्वधर्मीय लोकांपेक्षा आजचे स्वयंघोषित लोक जास्त हुशार झाले का? दोनशे चौऱ्याशी लोकांच्या सह्या झाल्या तेव्हा कुठे डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे शिल्पकार ठरले.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा:९१३०९७९३००

आणि याच संविधानाने अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक माणसाला माणसात आणले, गरीब, श्रीमंत, स्त्री पुरुष किंवा जाती धर्म याचा विचार न करता केवळ व्यक्ती म्हणून मान सन्मान आणि संधी निर्माण करून करू दिली. देशाच्या संपत्तीत प्रत्येकाला समान हिस्सा दिला. झोपडीतील, शेतीतील, महालातील, श्रीमंत माणसाला एकच महत्त्व दिले आणि सर्वांना देश चालवण्याचा अधिकार दिला. ते दिले म्हणून चौकटीत च्या आत असणाऱ्या महिला विमानात फिरतात, चुल आणि मुलच सांभाळणाऱ्या महिला आज जिल्हा देश सांभाळत आहेत, महिलांनी पुरुषांच्या समोर उभेही राहू नये असे असताना आज पुरूषांच्या समोर स्त्रिया जात आहेत, चहा विकणारा देश चालवत आहे हे केवळ आणि केवळ भारतीय संविधानाने मुळ शक्य झाले. जनतेच्या हातात सत्ता संविधानाने दिली. याचा अर्थ कोणत्याही प्रकारचा भेद न करता कोणताही योग्य व्यक्ती जो मतदार आहे देशाच्या कोणत्याही भागात देशाचा कारभार करणयासाठी निवडणूकीच्या माध्यमातून किंवा नोकरीच्या माध्यमातून जाऊ शकतो तिथे गरीब श्रीमंत स्त्रि पुरुष किंवा जात धर्माचा कोणताही भेद केला जात नाही. यालाच जनतेची सत्ता म्हणतात. जनतेच्या हितासाठी जनतेनेच आपला कारभार करून आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगती करून घेणे म्हणजे प्रजासत्ताक आहे. प्रजासत्ताक देशात संविधानाने बोलण्याचा, अभिव्यक्त होण्याचा, व्यवसाय करण्याचा, शिक्षणाचा, सार्वजनिक मालमत्तेचा व नैसर्गिक साधन संपत्तीचा उपभोग घेण्याचा अधिकार दिला पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा अधिकार नाकारला कोणी यावरही चर्चा होणे आवश्यक आहे. महिलांवर बंधने घालून त्यांना गुलाम करून शिक्षण व विकासापासून कोणी दुर केले होते? मुलींनी घराबाहेर पडू नये, मुली शिकल्या म्हणजे धर्म बुडतो असे माणल्या जाणाऱ्या समाजातील स्त्रियांना पुरुषां प्रमाणे मानसन्मान, शिक्षण, नोकरी आणि पगार देऊन सामाजिक व आर्थिक उन्नती करणारे संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल किती महिला प्रामाणिक आहेत. अंगावर महागडी साडी, चेहऱ्यावर फांऊंडेशन, हे फक्त संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत. कोणत्याही धर्माने महिलांना एवढे हक्क अधिकार तर सोडा पण महिलेला माणूस म्हणून सुद्धां सन्मान दिला नाही ते महान काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केले. गरिबातील गरीब व्यक्तीही शिक्षण घेऊ शकतो, निवडणूक लढू शकतो आणि देश चालवू शकतो हे संविधानाने दिलेले अधिकारी असले तरीही सत्य काय आहे यावर विचार केला तर शिक्षण आणि निवडणूक धनदांडग्या लोकांच्या हाती गेले. निवडणूक व्यक्तीचे काम नाही तर पैसा बघून लढवली जाते. प्रजेची सत्ता असताना प्रजेला एवढे भिकारी बनवले कि प्रजा निवडणुकीत हजार पाचशे घेऊन कोणालाही मत देते ही व्यवस्था निर्माण केली गेली. हजार पाचशे एका मतासाठी देणारा निवडून आला कि किती कमवत असेल याची कल्पना सर्वसामान्य मानसाला नसणारच आहे. संविधानाने अभिव्यक्त होण्याचा अधिकार दिला असला तरीही येथे जनतेचा आवाज दाबला जातो, जनतेच्या समस्या लक्षात घेतल्या जात नाहीत, अडाणी, पाखंडी लोक राजकारणात जाऊन धर्माच्या आडून चुकिचा इतिहास, चुकिचा धर्म सांगुन लोकांना बौद्धिक गुलाम व भक्त बनवत आहेत. जनतेचा आवाज कोणीच ऐकायला तयार नाही. मिडिया निवडणूक आयोग, विरोधी पक्ष आणि धर्माचे लोक सत्तेचे गुलाम झाल्याने जनतेच्या समस्या वाढत आहेत आणि जे सत्तजसोबत हात मिळवणी करत आहेत त्यांची भरभराट होत आहे. प्रजासत्ताक मध्ये सत्ता जनतेच्या हाती असण्याचे एकमेव शस्त्र म्हणजे मताधिकार हा मताधिकार इव्हिएम च्या माध्यमातून काढून घेतला आहे. जनता विरोधात, कार्यकर्ते विरोधात, नेते विरोधात असतानाही जर तेच लोक निवडून येत असतील तर त्यांना लोकांच्या मताची नाही तर यंत्राची गरची आहे. म्हणून लोक पेपर वर निवडणुक व्हायला पाहिजे म्हणत असताना ही यंत्रावर होत आहेत. याचाच अर्थ प्रजेची सत्ता येण्या आधीच प्रजेला सत्तेपासून कोसो दुर नेले जात आहे आणि हेच सत्य आहे. लोकशाही मध्ये सत्य बोलणे गुन्हा आणि भ्रष्टाचार, व्यभिचार, धार्मिक कट्टरता पाळणे संस्कार झाले आहेत. देश अधोगतीला जात असताना देशातील मुठभर नेते मात्र देशातील माया जमवत आहेत हे लोकशाहीला मारक आहे. खरी लोकशाही, खरा प्रजासत्ताक दिन यावर चर्चा प्रबोधन होत नाही आणि एक भारतीय भारताच्या विकासाचा ग्रंथ वाचत नाही तो देश कशाच्या आधारावर प्रगती करेल? जगाला लाजवेल असे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण करून वेगवेगळ्या जातीधर्माला, वेगवेगळ्या बोलीभाषेला, वेगवेगळ्या खानपान असलेल्या, वेगवेगळी वेशभूषा असलेल्या आणि वेगवेगळी नावे असलेल्या लोकांना एकच ओळख भारतीय म्हणून देऊन समान हक्क अधिकार बहाल केले आणि ते जनतेला लागु झाले तो हाच दिवस २६ जानेवारी. प्रजासत्ताक दिनांचा विजय असो. भारताचे संविधान आणि संविधानाचे निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन.

प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय सदिच्छा!

# प्रजासत्ताक दिन विशेष : अधिकारांच्या उत्सवात 'कर्तव्याचे' भानच ठरेल राष्ट्रनिर्मितीचा पाया !

प्रस्तावना : २६ जानेवारी १९५० रोजी भारताने संविधानाचा स्वीकार केला आणि भारत एक सार्वभौम, प्रजासत्ताक राष्ट्र बनले. दरवर्षी हा दिवस आपण मोठ्या दिमाखात साजरा करतो. संविधानाने आपल्याला प्रगत लोकशाहीतील सर्वश्रेष्ठ 'अधिकार' दिले आहेत; मात्र आज ७ दशकांनंतर आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे की, आपण अधिकारांचा उपभोग घेताना आपल्या 'कर्तव्यांना' न्याय दिला आहे का? राष्ट्र केवळ कागदी कायद्यांनी नाही, तर नागरिकांच्या कर्तव्यभावनेने समृद्ध होते. अधिकारांचा आग्रह धरणारा नागरिक स्वतःपुरता विचार करतो, पण कर्तव्याचे पालन करणारा नागरिक हा 'राष्ट्रकेंद्रित' असतो. म्हणूनच आजच्या जागतिक परिस्थितीत अधिकारांपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणे, ही काळाची गरज बनली आहे.

जागतिक संघर्ष आणि भारतापुढील आव्हाने : आज संपूर्ण विश्व तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. रशिया-युक्रेन असो वा इस्रायल-हमास संघर्ष, जगातील अस्थिरतेचा परिणाम भारतावरही होत असतो. आजचे युद्ध केवळ सीमेवर बंदुकीने लढले जात नाही, तर ते 'हायब्रीड वॉर'च्या स्वरूपात आपल्या घरात शिरले आहे. सायबर हल्ले, आर्थिक युद्ध, सांस्कृतिक आक्रमणे, अमली पदार्थांची तस्करी आणि अर्बन नक्षलवादासारखी अंतर्गत आव्हाने आपल्या समोर उभी आहेत. या छुप्या आघाड्यांवर लढण्यासाठी केवळ सैन्य पुरेसे नाही, तर प्रत्येक नागरिकाचे सतर्क राहणे आवश्यक आहे. ही सतर्कता म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपले 'राष्ट्रीय कर्तव्य' आहे.




आत्मनिर्भर भारत आणि आर्थिक कर्तव्य : देशाची अर्थव्यवस्था बळकट करणे हे केवळ सरकारचे काम नसून ते नागरिकांचे कर्तव्य आहे. 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी स्वदेशी उत्पादनांचा आग्रह धरणे, करप्रणालीचे प्रामाणिक पालन करणे आणि राष्ट्रविरोधी शक्तींच्या आर्थिक नाड्या आवळणे आवश्यक आहे. जेव्हा आपण परदेशी वस्तूंच्या जागी स्वदेशी वस्तू निवडतो, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे भारताच्या संरक्षण व्यवस्थेला आणि अर्थव्यवस्थेला बळकट करत असतो. प्रत्येक नागरिक एक सैनिक या भावनेतून केलेली प्रत्येक छोटी कृती राष्ट्रनिर्मितीला हातभार लावते.



रमेश शिंदे
राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती

राष्ट्रध्वजाचा सन्मान : श्रद्धेचा की केवळ सवयीचा? : प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी आपण तिरंग्याला वंदन करतो; परंतु त्या सन्मानाचे सातत्य किती काळ टिकते? २६ जानेवारीच्या दुपारीच रस्त्यांवर, कचराकुंडीत किंवा नाल्यात प्लास्टिकचे आणि कागदी राष्ट्रध्वज पडलेले दिसतात, हे पाहून कोणत्याही राष्ट्रप्रेमी नागरिकाचे हृदय पिळवटून निघते. अनेकजण उत्साहाच्या भरात राष्ट्रध्वजाच्या रंगाचा केक कापतात किंवा कपड्यांवर, चेहऱ्यावर तिरंगा रंगवतात. हा राष्ट्रध्वजाचा घोर अपमान आहे.

भारतीय ध्वजसंहितेचे पालन करणे हे आपले कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य आहे. तसेच, काही आंतरराष्ट्रीय संकेतस्थळांवर भारताचा नकाशा चुकीचा दाखवला जातो, ज्यात काश्मीर किंवा अरुणाचल प्रदेशचा भाग वगळला जातो. अशा वेळी केवळ मूकदर्शक न राहता, संबंधित संस्थेला पत्र लिहून किंवा कायदेशीर मार्गाने निषेध नोंदवून तो नकाशा दुरुस्त करून घेणे, हे आपले जागरूक नागरिक म्हणून पहिले कर्तव्य आहे.

प्रजासत्ताक दिनी नागरिक म्हणून काय करावे? : प्रजासत्ताक दिन म्हणजे केवळ सुट्टीचा दिवस नव्हे, तर तो 'कर्तव्य संकल्प' करण्याचा दिवस आहे. त्यासाठी खालील कृती आपण अवश्य कराव्यात :

१. प्लास्टिकच्या ध्वजांचा वापर पूर्णपणे टाळावा आणि राष्ट्रध्वजाचा कुठेही अवमान होत असल्यास तो धैर्याने रोखावा. ध्वज संहितेचे पालन करावे

२. केवळ ठराविक नेत्यांचीच नव्हे, तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांचे चरित्र अभ्यासावे आणि त्यांचे मूल्य संस्कार पुढच्या पिढीला द्यावेत. यातून क्रांतिकारकांचे स्मरण करावे

३. केवळ अधिकार मागण्यासाठी नव्हे, तर शिस्तबद्ध नागरिक म्हणून रहदारीचे नियम पाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि भ्रष्टाचाराला विरोध करणे हा देखील प्रजासत्ताक दिनाचा सन्मानच आहे. यातून संविधान आणि नियमांचा आदर राखावा.

४. आपली संस्कृती, भाषा आणि राष्ट्रप्रतीकांचा (राष्ट्रगीत, वंदे मातरम्) सन्मान राखणे आणि त्याचा अवमान करणाऱ्यांना प्रबोधन करणे हे आपले कर्तव्य आहे.

ज्या देशाचा नागरिक आपल्या अधिकारांपेक्षा कर्तव्याला श्रेष्ठ मानतो, तो देश जगात अजिंक्य ठरतो. स्वातंत्र्य मिळवून देणे ही क्रांतिकारकांची जबाबदारी होती, पण ते स्वातंत्र्य टिकवणे आणि समृद्ध करणे ही आपली जबाबदारी आहे. या प्रजासत्ताक दिनी आपण संकल्प करूया की, मी केवळ माझ्या हक्कासाठी लढणारा नागरिक न राहता, राष्ट्राच्या सन्मानासाठी अखंड कार्यरत असणारा 'सैनिक' बनेन.


जय हिंद ! जय भारत !

# भारत बलशाली होईल

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही राष्ट्रीय सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्याला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या गुलामीतून भारत स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाचे कायदे हे भारतीय राज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर ( कलमावर ) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम व कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते.

हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे आव्हान करण्यात आले. तेव्हा देशाचे संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमण्यात आली. या संमतीने संविधानाचा मसुदा तयार करून तो ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सभेपुढे सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५


डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने दोन वर्ष, अकरा महिने आणि अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यावर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले.

संविधानाने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल !

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते. कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे. २६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली. त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो. कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात, धर्म, पंथ, वंश, गरीब-श्रीमंतव्द्वेष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात.

२६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली. २६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो. आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत. मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो. भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे, झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार, यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल. अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी, भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी - जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली. १५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली. यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे. परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी, निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते. ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दुःखद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही. आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल. याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा. आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचलसंपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल. याचे स्वागत आपले पुर्वज, शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल. देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता. प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा. यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे. कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत. जय हिंद!



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

# राष्ट्रध्वजाचा सन्मान राखायलाच हवा !

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कागदी आणि कापडी ध्वज बाजारात विक्रीसाठी आले आहेत. राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने सरकारच्या वतीने 'हर घर तिरंगा मोहीम' राबवली जात असल्याने घरोघरी त्यादृष्टीने सिद्धता एक आठवडा आधीपासूनच सुरु झाली आहे. कपड्यांच्या दुकानांचे डिस्प्ले तिरंगी कापडांनी सजले आहेत. अन्य दुकानांनीही आपले देशाप्रतीचे प्रेम दर्शवण्यासाठी आणि ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा वापर करून दुकानाबाहेर सजावट केली आहे. सामाजिक माध्यमांवर देशप्रेमाचे स्टेटस आतापासूनच झळकू लागले आहेत. अनेक कार्पोरेट कंपन्यांनी यंदा शनिवारी कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी तिरंगा रंगांची अथवा पारंपरिक पोषाखाची थीम ठेवली होती. अनेक सामाजिक संस्था आणि मंडळांमध्ये, शाळा महाविद्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, त्याची सिद्धताही जोमाने सुरु आहे. ऑनलाईन शॉपिंग संकेतस्थळांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्पादनांवर विशेष सवलत ठेवली आहे. हिंदी मराठी चॅनल्सवरील डेली सोप आणि रिऍलिटी शोजमध्ये सुद्धा सध्या प्रजासत्ताक दिनाचाच फिवर आहे. मिठाईच्या आणि केक्सच्या दुकानांत तिरंग्याच्या रंगाच्या विविध मिठाया आणि केक्स विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. सारे वातावरण देशभक्तीने जणू न्हाऊन निघाले आहे. प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन जवळ आला कि देशभरात देशप्रेमाचे वारे जोराने वाहू लागतात.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने कागदी आणि कापडी राष्ट्रध्वज सर्वत्र विक्रीसाठी आले आहेत. ५-१० रुपयांत मिळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे; मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे का हे अभ्यासनेही आज गरजेचे बनले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हालअपेष्टा सहन केल्या; मात्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देशप्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही. राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रस्त्यावर पडलेले ध्वज आणि ध्वजांचे अवशेष गोळा करून त्यांची ध्वजसंहितेनुसार योग्य ती विल्हेवाट लावण्याचे काम काही स्वयंसेवी संघटना दरवर्षी करत असतात. मात्र त्यांच्यावर ही वेळ येऊच न देण्याची जबाबदारी आपली नव्हे काय ? स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपले राष्ट्रप्रेम दाखवण्यासाठी राष्ट्रध्वजाचे बॅज आपण छातीवर लावून मिरवतो. गाड्यांवर, घरांवर, दुकानांवर ध्वज फडकावतो, कागदी ध्वज विकत घेऊन ते पाल्यांना देतो; मात्र ते फाटतात, हरवतात तेव्हा 'जाऊ दे, १० रुपयांचा तर झेंडा होता' असे विचार आपल्या मनात येतात आणि आपण ते शोधायचा प्रयत्नही करत नाही. या दिवशी रस्त्यावरून जाताना एखादा ध्वज रस्त्यावर पडलेला दिसला तर तो उचलून खिशात ठेवण्याचा विचार तर येतो मात्र आजूबाजूचे लोक काय म्हणतील या विचाराने आपण तसे करण्याचे टाळतो. खरेदी केलेले ध्वज पुढील राष्ट्रीय सणासाठी जपून ठेवतो का किंवा ते फाटले असतील तर ध्वजसंहितेनुसार त्या ध्वजांची विल्हेवाट लावतो का ? आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वजसंहिता प्रकाशित करण्यात येते मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०



राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी शेकडो क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, घरादाराची राखरांगोळी केली, आयुष्यभर कारावास भोगला. त्यांच्याच बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्यात सुखाने जगत आहोत. लोकशाही व्यवस्थेच्या सुख सुविधा उपभोगत आहोत. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी आजही आपले सैनिक सीमेवर ऊन, वारा, पाऊस कशाचीच तमा न बाळगता खंबीरपणे उभे असतात त्या राष्ट्रध्वजाचे उचित मूल्य आपल्या अंतर्मनात बिंबायला हवे. राष्ट्रीय सणांच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा एकही राष्ट्रध्वज रस्त्यावर इतस्ततः पडलेला दिसणार नाही तेव्हाच आपल्यातील राष्ट्रध्वजाविषयीची अस्मिता जागृत झाली असे म्हणता येईल.

## अशोकायन...

### राष्ट्रभक्तिचा महापूर

वारं पाहून उफणण्यात
आम्ही आहोत वाकबदार
बघा गणराज्य दिनीआमच्या
राष्ट्र भक्तिला कशी येते धार ..

वर्षातून दोन वेळा
येते भौ भरती
बाकी मग वर्षभर
आहोटीच ओहोटी ... !

तिसरी शक्ति बनण्याचे
होण्या स्वप्न साकार
करावे लागेल राष्ट्रनिष्ठा
कर्तव्य दायीत्वाने
भ्रष्टाचार मुक्त व्यवहार .. !



प्रा.अशोक सारडा मेहकर
(९४२२३९४३३९)

# फोनपे लिमिटेडने सेबीकडे दाखल केला यूडीआरएचपी १

**नागपूर, २५ जानेवारी :** डिजिटल पेमेंट सेवा, डिजिटल वितरण सेवा आणि वित्तीय सेवा यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करणाऱ्या फोनपे लिमिटेड या तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीने सेबीकडे आपला यूडीआरएचपी– दाखल केला आहे.

कंपनी प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ग्राहक पेमेंट, व्यापारी पेमेंट, कर्ज वितरण तसेच विमा वितरण या सेवा पुरविते. याशिवाय कंपनीने दोन नवीन प्लॅटफॉर्म विकसित केले असून त्यांचा वेगाने विस्तार करत आहे. यातील एक आहे . हा या कंपनीचा स्टॉक ब्रोकिंग आणि म्युच्युअल फंड्स वितरणासाठीचा प्लॅटफॉर्म आहे. दुसरा आहे इंडस अॅपस्टोअर. हा मोबाईल अॅप्ससाठी मार्केटप्लेस म्हणून काम करतो. कंपनीचे सर्व प्लॅटफॉर्म पुरस्कारप्राप्त आणि उच्च क्षमतेच्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत. ही तंत्रज्ञान प्रणाली मजबूत आणि विश्वासार्ह आहे. ती एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर काम करू शकते, सुरक्षित आहे आणि खर्चही कमी ठेवते. त्यामुळे वेगवेगळ्या प्लॅटफॉर्म्सवर तसेच नव्या गरजांसाठी ती सहज वापरता येते.

या यूडीआरएचपी अंतर्गत कंपनीचे सध्याचे भागधारक आपले ५०,६६०,४४६ पर्यंत इक्विटी शेअर्स विक्रीसाठी उपलब्ध करून देत आहेत. प्रत्येक शेअरचे दर्शनी मूल्य १ रुपया आहे.

एप्रिल २०१६ मध्ये युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) ही प्रणाली सुरू झाल्यानंतर, ऑगस्ट २०१६ मध्ये या कंपनीने यूपीआयवर आधारित अॅप सुरू केले. असे करणारी ही भारतातील पहिली खासगी, बँकेतर कंपनी ठरली, अशी माहिती नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (एनपीसीआय) आकडेवारीवर आधारित रेडसीयर अहवालात नमूद करण्यात आली आहे.

डिसेंबर २०२० ते सप्टेंबर २०२५ या काळात यूपीआय व्यवहारांची संख्या आणि एकूण व्यवहार मूल्य (टीपीव्ही) या दोन्ही बाबतीत कंपनीने सतत आघाडी ठेवली. त्यामुळे ती भारतातील सर्वात मोठी डिजिटल पेमेंट्स प्लॅटफॉर्म बनली आहे, असे एनपीसीआयच्या आकडेवारीवर आधारित रेडसीयर अहवालात नमूद आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी कंपनीकडे सुमारे ६५.७५ कोटी नोंदणीकृत वापरकर्ते आणि ४.७२ कोटी नोंदणीकृत व्यापारी होते.

कोटक महिंद्रा कॅपिटल कंपनी लिमिटेड, जेपी मॉर्गन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सिटीग्रुप ग्लोबल मार्केट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मॉर्गन स्टॅन्ले इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, क्सिस कॅपिटल लिमिटेड, गोल्डमन सॅक्स (इंडिया) सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड, जेफरीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि जे. एम. फायनान्शियल लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर करण्यात येणारे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) या शेअर बाजारांमध्ये नोंदविण्याचा कंपनीचा प्रस्ताव आहे.

# महाराष्ट्रातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांमधील ५००० हून अधिक महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी गोदरेज अॅग्रोव्हेटची महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासोबत भागीदारी

**वाशीम, २५ जानेवारी :** अग्रगण्य कृषी–व्यवसाय कंपनी असलेल्या गोदरेज अॅग्रोव्हेट लिमिटेडने (गोदरेज अॅग्रोव्हेट) ग्रामीण शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम–उमेद)सोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केल्याची घोषणा आज केली. २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' (आयवायडब्ल्यूएफ २०२६) म्हणून साजरे करण्याच्या संयुक्त राष्ट्राच्या घोषणेशी हे सहकार्य सुसंगत आहे. या अंतर्गत कृषी–अन्नप्रणालीमध्ये महिलांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकते आणि लैंगिक समानता दूर करण्यासाठी व उपजीविका मजबूत करण्यासाठी कृती करण्याचे आवाहन करते. तीन वर्षांच्या या भागीदारीचा उद्देश स्वयंसहायता गट (एसएचजी) आणि महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे, शेतीची उत्पादकता सुधारणे आणि लवचिक उपजीविका निर्माण करणे हा आहे.

पहिल्या वर्षी हा कार्यक्रम कापूस पिकवणाऱ्या नऊ प्रमुख जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करेल; ज्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड यांचा समावेश आहे. या अंतर्गत ५,००० पेक्षा जास्त महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून ५०,००० एकरपेक्षा जास्त शेतजमीन समाविष्ट केली जाईल आणि प्रत्येक जिल्ह्यातील १०० बचत गटांना जोडले जाईल. पुढील तीन वर्षात ही मोहीम संपूर्ण महाराष्ट्रात ५,००० पेक्षा जास्त बचत गटांना सहाय्य करण्यासाठी विस्तारली जाईल, तसेच कापसाव्यतिरिक्त मका आणि इतर पिकांपर्यंत या मोहिमेचा विस्तार करण्याची योजना आहे.



या सामंजस्य करारानुसार, जीएपी, आयपीएम आणि सुरक्षा पद्धतींवर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यासाठी; शेतकरी क्षेत्र शाळा आणि प्रात्यक्षिक भूखंडांचे आयोजन करण्यासाठी; तसेच सुरक्षा किट वितरित करण्यासाठी गोदरेज अॅग्रोव्हेट एम.एस.आर.एल.एम.– उमेदसोबत काम करेल. एम.एस.आर.एल.एम.–उमेदआपल्या बचत गट आणि कृषी सखी नेटवर्कद्वारे संघटन तसेच समन्वयाची सोय करेल, तर गोदरेज अॅग्रोव्हेट या कार्यक्रमासाठी निधी पुरवेल आणि त्याची अंमलबजावणी करेल.

या भागीदारीवर भाष्य करताना, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (एमएसआरएलएम–यूएमईडी)मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. निलेश सागर (आयएएस) म्हणाले, हा सामंजस्य करार तळागाळातील संस्थांना बळकट करून,त्यांच्या उपजीविकेमध्ये वाढ करून ग्रामीण महिलांना सक्षम करण्याच्या आमच्या ध्येयाशी सुसंगत आहे. आमच्या नेटवर्कचा आणि गोदरेज अॅग्रोव्हेटच्या कौशल्याचा उपयोग करून, आमच्या महिला शेतकऱ्यांना शेतीचे कार्यक्षमतेने व्यवस्थापन करण्यासाठी तसेच ग्रामीण महाराष्ट्राची सामाजिक–आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वैज्ञानिक पीक व्यवस्थापन पद्धतींनी सुसज्ज करणे, हा आमचा उद्देश आहे.

गोदरेज अॅग्रोव्हेटचे सीईओ आणि एमडी सुनील कटारिया म्हणाले, भारतीय शेती एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे, जिथे उत्पादकता, शाश्वतता आणि सर्वसमावेशकता यांची एकत्रित प्रगती होणे आवश्यक आहे. गोदरेज अॅग्रोव्हेटमध्ये आम्ही महिला शेतकऱ्यांना या परिवर्तनाचा केंद्रबिंदू मानतो. संशोधन आणि सामुदायिक सहभागाच्या समन्वयातून भारतीय शेतीत शाश्वत वाढ घडवून आणण्यासाठी कटिबद्ध असलेली एक संस्था म्हणून, आम्हाला एमएसआरएलएम–यूएमईडीसोबत भागीदारी करताना आनंद होतो आहे. या भागीदारीद्वारे, आम्ही महिला शेतकऱ्यांना उच्च-परिणामकारक आणि व्यावहारिक कृषी तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्याचे ध्येय ठेवले आहे, जेणेकरून त्या अधिक चांगले उत्पादन मिळवू शकतील आणि त्यांच्या कुटुंबाचा उत्कर्ष करू शकतील. जबाबदारीने विस्तार करू शकतील असे आदर्श नमुने तयार करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

या उपक्रमाच्या तांत्रिक पैलूवर प्रकाश टाकताना, गोदरेज अॅग्रोव्हेट लिमिटेडच्या पीक संरक्षण व्यवसायाचे सीईओ, राजवेलू एन.के. म्हणाले, महाराष्ट्र हे भारतातील सर्वात महत्त्वाच्या कापूस उत्पादक राज्यांपैकी एक आहे आणि येथील शेतकऱ्यांसमोरील आव्हाने सोडवण्यासाठी विज्ञान–आधारित,प्रदेश–विशिष्टदृष्टिकोनाची आवश्यकता आहे. योग्य वेळी योग्य तोडगा काढणे महत्त्वाचे असल्याने, हे सहकार्य केवळ तत्काळ कृषीविषयक सुधारणांसाठीच नव्हे, तर एक अनुकरणीय, ज्ञान–आधारितीक संरक्षण आराखडा तयार करण्यासाठी प्रेरणा म्हणून काम करेल, जो कालांतराने विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये आणि वेगवेगळ्या पिकांसाठी लागू केला जाऊ शकतो.

या सहकार्याच्या व्यापक परिणामांवर जोर देत, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे ग्रुप प्रेसिडेंट कॉर्पोरेट अफेअर्स, राकेश स्वामी म्हणाले, सामान्य लोक आणि पर्यावरण हे आमच्या कोणत्याही उद्देशाच्या केंद्रस्थानी असतात. उद्योग आणि सार्वजनिक संस्था कशा प्रकारे एकत्र येऊन महत्त्वपूर्ण सामाजिक बदल घडवून आणू शकतात, याचे एमएसआरएलएम–यूएमईडीसोबतचा हा उपक्रम म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे. महिला शेतकऱ्यांना सक्षम केल्याने केवळ कृषी उत्पादकताच वाढत नाही, तर ग्रामीण समाजही मजबूत होतो. याचा दीर्घकालीन परिणाम राज्य आणि देशावर होतो.

महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धती अवलंबण्यास, मार्केट नेटवर्कपर्यंत पोहोचण्यास आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करून, हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात उत्पादकता, उपजीविका आणि ग्रामीण लवचिकतेमध्ये चिरस्थायी सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतो.

# समीर गायकवाडसारखे आणखी किती बळी आपण जाऊ देणार?

## समीर गायकवाड यांच्या श्रद्धांजली सभेत हिंदुत्वनिष्ठांचा संतप्त प्रश्न

कोल्हापूर : निष्पाप असलेल्या हिंदुत्वनिष्ठ कै. समीर गायकवाड कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरणात प्रशासकीय व्यवस्था आणि पुरोगामी इकोसिस्टिम यांच्या खोट्या आरोपांचा बळी ठरले. केवळ सनातन संस्थेचा साधक असल्याने त्यांना कारागृहात रहावे लागले आणि यात त्याचे निष्पाप कुटुंबियही भरडले गेले. तरी यापुढील काळात समीरसारखे आणखी किती बळी आपण जाऊ देणार ? असा प्रश्न संतप्त प्रश्न उपस्थित करत समीर यांच्या कुटुंबियांना शासनाकडून ठोस साहाय्य मिळावे, अशी एकमुखी मागणी हिंदुत्वनिष्ठांनी केली. ही मागणी राधाकृष्ण मंदिर येथे कै. समीर गायकवाड यांच्यासाठी आयोजित श्रद्धांजली सभेत करण्यात आली. या सभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे करवीर तालुकाप्रमुख श्री. राजू यादव यांनी कै. समीर यांच्या कुटुंबियांसाठी आर्थिक साहाय्य घोषीत केले.

या सभेचे आयोजन सकल हिंदू समाज, समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटना व हिंदु जनजागृती समिती यांच्या वतीने करण्यात आले होते. समीर यांच्यासाठी खटला लढवणाऱ्या अधिवक्त्यांपैकी एक असलेले हिंदु विधीज्ञ परिषदेचे अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर म्हणाले, कै. समीर हे हत्येच्या दिवशी पालघर येथे असूनही यंत्रणा आणि प्रसारमाध्यमांचा बळी ठरले आणि त्यांना कॉ. पानसरे यांच्या हत्येचा आरोप सहन करावा लागला. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात शरद कळसकर आणि सचिन अंधुरे यांना शिक्षा झाल्यावर आपणही निर्दोष असतांना आपल्याला अशी शिक्षा होऊ शकते, हा ताण सतत त्यांच्या मनावर होता. मिडीया ट्रायलमुळे त्यांना कारागृहात रहावे लागले आणि अधिक सुरक्षेच्या नावाखाली कारागृहात मोठ्या छळाला त्याला सामोरे जावे लागले.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख श्री. किशोर घाटगे म्हणाले, पक्षातील नेत्यांशी चर्चा करून कै. समीर यांना ठोस साहाय्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू. समीर यांची स्मृती चिरंतन रहाण्यासाठी त्यांच्या नावावे व्यासपीठ चालू करणे, रुग्णवाहिका चालू करणे असे काहीतरी केल्यास त्यांचे नाव सतत स्मरणात राहिल.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपजिल्हाप्रमुख श्री. भगवंतराव जांभळे म्हणाले, न्याययंत्रणेतील त्रुटींमुळे समीर यांच्यासारख्या अनेकांचे खटले प्रलंबित रहात आहेत. तरी यापुढील काळात हिंदुत्वनिष्ठ शासनाने पुढाकर घेऊन अशा सर्वच खटल्यांचा लवकर निपटारा कसे होईल, हे पाहिले पाहिजे. खटला संपल्यावर समीर निर्दोष सुटला, तर त्यांना ज्यांनी अटक केली त्या पोलीस अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शिवसेनेचे श्री. राजू यादव यांनी केली. सनातन संस्थेचे डॉ. मानसिंग शिंदे म्हणाले, कसाबसारख्या कुख्यात आंतकवाद्याला वकील दिला जातो ; मात्र समीर यांना कोल्हापूर येथे पुरोगाम्यांनी वकील मिळू दिला नाही, हे दुदैवी आहे.

सूत्रसंचालक श्री. बाबासाहेब भोपळे यांनी हिंदु धर्मासाठी कार्य करणाऱ्या समीर यांच्यासारखे बळी परत जाऊ न देण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन केले. या सभेत हिंदुत्वनिष्ठ श्री. कमलाकर किलकिले, मंदिर महासंघाचे श्री. अशोक गुरव, अधिवक्ता रणजितसिंह घाटगे, हिंदू एकता आंदोलनाचे श्री. दिलीप भिवटे, हिंदु महासभेचे प्रवक्ते श्री. सुनील सामंत, भाजपच्या महिला सरचिटणीस सौ. वंदना बंबलवाड यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी मराठा तितुका मेळावावाचे श्री. योगेश केरकर, श्री. प्रमोद सावंत यांच्यासह विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# म्हणून भरत गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा अभिमान : मुख्यमंत्री

**बुलढाणा, २५ जानेवारी :** जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) गेल्या वर्षी करण्यात आलेल्या ५०० कोटी रुपयांच्या सामंजस्य कराराची अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे उद्योजक भरत गीते यांनी अवघ्या एका वर्षात यशस्वी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष उत्पादन सुरू केले आहे. वर्षभरात उद्योग उभारणी करणाऱ्या गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा मला अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

दावोस येथे सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत देवेंद्र फडणवीस आणि भरत गीते यांच्यातील संवादावेळी ते बोलत होते. या भेटीदरम्यान उद्योग उभारणीतील नियोजन, वेगवान अंमलबजावणी, प्रशासन आणि उद्योजकांमधील समन्वय तसेच उत्पादन क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील वाढते महत्त्व यावर सविस्तर चर्चा झाली. आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया आणि व्होकल फॉर लोकल या केंद्र सरकारच्या उपक्रमांना बळ देणाऱ्या या उपक्रमांतून कमी कालावधीत उद्योग उभारणी शक्य असल्याचा प्रेरणादायी संदेश देशभरातील उद्योजकांना मिळाला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी येथे उभारण्यात आलेल्या तौरल इंडियाच्या अत्याधुनिक अॅल्युमिनियम कास्टिंग्ज उत्पादन प्रकल्पाने अल्पावधीतच उत्पादन सुरू करत राज्यासमोर आदर्श औद्योगिक मॉडेल उभे केले आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून, स्थानिक औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळाली आहे.

सामंजस्य करार कागदापुरता न राहता एका वर्षात प्रत्यक्ष उत्पादनात रूपांतरित होऊ शकतो, याचे भरत गीते आणि तौरल इंडिया हे उत्तम उदाहरण आहे. मराठी उद्योजकांमध्ये जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता आहे. त्यांना योग्य धोरणात्मक पाठबळ दिल्यास महाराष्ट्र उद्योग क्षेत्रात नवे शिखर गाठेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

भरत गीते म्हणाले, तौरल इंडियाने २०१६ पासून औद्योगिक विस्तार करत ऊर्जा क्षेत्र, संरक्षण उत्पादन, आरोग्य उपकरणे तसेच एरोस्पेस क्षेत्रासाठी आवश्यक अचूक अॅल्युमिनियम कास्टिंग्ज निर्मितीत भरीव योगदान दिले आहे. विविध क्षेत्रांतील या योगदानामुळे राज्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळत असून, आर्थिक वाढीस हातभार लागत आहे.

उत्पादन क्षेत्र हे मजबूत अर्थव्यवस्थेचा कणा असून, वाहन उद्योग, अभियांत्रिकी, पायाभूत सुविधा, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक मोबिलिटी, संरक्षणपूरक उद्योग, कृषी प्रक्रिया आणि उच्च–मूल्यनिर्यातक्षम उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्यास राज्याचा औद्योगिक पाया अधिक भक्कम होईल, असा विश्वास गीते यांनी व्यक्त केला.

# टाटा मोटर्सकडून १७ नेक्स्ट–जनरेशन ट्रक्स लाँच

**अकोला, २५ जानेवारी :** भारतातील ट्रकिंग क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक व गतीशीलता सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आज आपल्या १७ ट्रक्सचा नेक्स्ट–जनरेशन पोर्टफोलिओ लाँच केला. हे ट्रक्स ७ टन ते ५५ टन कन्फिग्युरेशन्समध्ये उपलब्ध आहेत. यासह सुरक्षितता, नफा व प्रगतीमध्ये नवीन मापदंड स्थापित केले आहे. या सर्वसमावेशक लाँचमध्ये ऑल–न्यू अझुरा सिरीज, अत्याधुनिक टाटा Trucks.ev श्रेणी आणि प्रस्थापित प्राइमा, सिग्ना व अल्ट्रा प्लॅटफॉर्म्समधील मोठ्या अपग्रेड्सचा समावेश आहे. जागतिक सुरक्षितता मानकांचे (ECE R29 03) काटेकोरपणे पालन करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे ट्रक्स उत्पन्न क्षमता वाढवतात, एकूण मालकीहक्क खर्च कमी करतात आणि वेईकल अपटाइम वाढवतात, ज्यामुळे वाहतूकदारांना मोठे यश मिळते.



नवीन ट्रक्स लाँच करत टाटा मोटर्स लि.चे एमडी व सीईओ श्री. गिरीश वाघ म्हणाले, भारतातील ट्रकिंग क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत आहे, ज्याला प्रगतीशील राष्ट्रीय धोरणे, आधुनिक पायाभूत सुविधा आणि सुरक्षित, अधिक स्वच्छ व अधिक कार्यक्षम लॉजिस्टिक्ससाठी वाढत्या मागणीने गती दिली आहे. टाटा मोटर्स मापदंड स्थापित करण्यामध्ये नेहमी अग्रस्थानी आहे, जे उद्योगाच्या भविष्याला आकार देतात. लाँच करण्यात आलेल्या आमच्या नेक्स्ट–जनरेशन पोर्टफोलिओमध्ये ऑल–न्यूअझुरा सिरीज, दोन प्रगत उच्च–कार्यक्षम पॉवरट्रेन्स, आमच्या नवीन आय–एमओईव्ही आर्किटेक्चरवर आधारित भारतातील शून्य–उत्सर्जन इलेक्ट्रिक ट्रक्स व ट्रिपर्सची व्यापक श्रेणी, युरोपियन मानक केबिन्स व उद्योग–अग्रणी सुरक्षितता वैशिष्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अपग्रेड्स, अधिक पेलोड क्षमता आणि इंधन कार्यक्षमतेचा समावेश आहे, जे सर्व फ्लीट एज डिजिटल सेवांसह एकीकृत करण्यात आले आहेत. यासह आम्ही या वारशाला अधिक पुढे नेत आहोत. बेटर ऑल्वेज' तत्त्वामधून प्रेरित आमची नाविन्यतेप्रती अविरत मोहिम, स्थानिकीकरणाप्रती दृढ कटिबद्धता आणि ग्राहकांना यशस्वी करण्यावरील निरंतर फोकस आत्मनिर्भर भारत'च्या दृष्टिकोनाशी संलग्न आहेत, ज्यामुळे शाश्वत गतीशीलतेमध्ये नेतृत्व करण्याप्रती भारताचा आत्मनिर्भरपणा व महत्त्वाकांक्षा अधिक दृढ झाली आहे.''

## सोनी सबवरील 'गणेश कार्तिकेय' मालिकेत काम करणारी श्रेनु पारिख म्हणते, मराठी कुटुंबात लग्न केल्यानंतर मी अष्टविनायक मंदिरांबद्दल खूप काही ऐकले



सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही पौराणिक मालिका प्रेक्षकांना गणेशाच्या अष्टविनायक रूपांचे दर्शन करण्यासाठी आमंत्रित करत आहे. मालिकेतील सध्याच्या कथाभागात अष्टविनायक रूपांच्या मागील कथा आणि बोध प्रेक्षक अनुभवत आहेत. या प्रत्येक दिव्य रूपाच्या मागील आध्यात्मिक लक्षणीयता प्रेक्षकांनी जाणावी, हा मालिकेचा प्रयत्न आहे.

श्रेनू पारिख, जी शोमध्ये देवी पार्वतीची भूमिका साकारत आहे, हिच्यासाठी हा ट्रॅक घरात एक परिचित सूर घेऊन आला आहे. महाराष्ट्रीयन कुटुंबात विवाह झाल्यानंतर तिने अष्टविनायक मंदिरांविषयी अनेकदा ऐकले होते, आणि आता हा ट्रॅक पडद्यावर उलगडताना पाहणे हे तिच्यासाठी आणि तिच्या पती अक्षयसाठी एक सामायिक अनुभव ठरले आहे. या अनुभवाला आणखी खास बनवते ते म्हणजे या शोमुळे कुटुंबात सुरू झालेल्या संवाद. एपिसोड्स प्रसारित होत असताना, श्रेनूच्या सासरच्या मंडळी अष्टविनायक यात्रेशी संबंधित कथा, विधी आणि आठवणी शेअर करतात, ज्यामुळे पाहण्याचा अनुभव अधिक रोचक आणि परंपरेशी जोडलेला होतो.

आपले विचार शेअर करताना श्रेनू म्हणते, महाराष्ट्रीयन कुटुंबात विवाह झाल्यानंतर मी अष्टविनायक मंदिरांविषयी खूप काही ऐकले आहे आणि आता मी त्या कथा पडद्यावर पुन्हा जगत आहे. हा ट्रॅक पाहताना अक्षय आणि मी मिळून मंदिरांविषयी, त्यांच्या दंतकथांविषयी आणि भक्तांसाठी त्यांच्या महत्त्वाविषयी अनेक नवीन गोष्टी शिकत आहोत. सर्वात खास म्हणजे माझे सासरचे आता आमच्यासोबत बसतात आणि अष्टविनायक यात्रेशी संबंधित त्यांचे स्वतःचे अनुभव, विधी आणि आठवणी शेअर करतात. हे घरात एक सामायिक कौटुंबिक क्षण बनले आहे. त्यामुळे या कथा पडद्यावर साकारताना माझ्यासाठी त्या अधिक वैयक्तिक आणि आत्मीय वाटतात.

## राशीभविष्य

**मेष :** तुमच्या कामात प्रगतीच्या संधी तुम्हाला मिळतील. गृहिणींना कामाचा ताण वाढू शकतो. त्यामुळे आरोग्याची काळजी घ्या. जुने आजार पुन्हा उद्भवू शकतात.

**वृषभ :** आजचा दिवस संमिश्र राहील. तुमचे प्रलंबित असलेले सरकारी काम आज पूर्ण होण्याची दाट शक्यता आहे. मीडिया आणि मार्केटिंगशी संबंधित लोकांना त्यांच्या कामात विशेष फायदा मिळेल.

**मिथुन :** गुंतवणुकीच्या योजना सुरू करण्यासाठी आजचा दिवस अत्यंत शुभ आहे. भविष्यात चांगला फायदा मिळेल. अविवाहित लोक आज नवीन नातेसंबंध किंवा मैत्रीची सुरुवात करू शकतात.

**कर्क :** कौटुंबिक बाबींमध्ये बाहेरील व्यक्तीचा हस्तक्षेप होऊ देऊ नका. जुन्या मित्राची भेट फायदेशीर ठरु शकते. आपले वैयक्तिक विचार आणि बाहेरील लोकांसोबत शेअर करणे टाळा.

**सिंह :** कामाच्या ठिकाणी तुमच्या योगदानामुळे तुम्हाला आदर मिळण्याची शक्यता आहे. तुमचे खर्च नियंत्रणात ठेवा. अनावश्यक खर्च करणे टाळा, यामुळे तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**कन्या :** आजचा दिवस आनंददायी जाईल. वैवाहिक जीवनातील समस्या सुटतील. कुटुंबातील सदस्यांमध्ये आनंददायी वातावरण असेल. मुलांसोबत वेळ घालवल्याने आनंद मिळेल.

**तूळ :** आजचा दिवस तुमच्या बाजूने असेल. तुम्हाला नशिबाची चांगली साथ मिळेल. व्यवसायात अनपेक्षित आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी संयम ठेवा. कोणताही निर्णय घाईत घेऊ नका. तुमच्या मुलाच्या शिक्षणाशी संबंधित असलेल्या समस्या आज सोडवल्या जातील. त्यांना तुमच्या मदतीने प्रगती करता येईल.


**धनु :** आजचा दिवस कौटुंबिक बाबींसाठी शुभ आहे. कौटुंबिक समस्या आपोआपच सुटतील. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत आनंदाने वेळ घालवाल. धार्मिक कार्यात तुमची आवड वाढेल.

**मकर :** कौटुंबिक स्तरावर असलेले जुने वाद संपू शकतात. ज्यामुळे घरात सौहार्द राहील. कोणालाही अनावश्यक सल्ला देणे टाळा, यामुळे गैरसमज निर्माण होऊ शकतात.

**कुंभ :** नोकरी करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या कामाची योग्य दखल घेऊन नवीन जबाबदाऱ्या दिल्या जाऊ शकतात. करिअरमध्ये प्रगती होईल. तणाव निर्माण करणे टाळा आणि शांतता राखा.

**मीन :** आज दिवसभर थोडा आळस जाणवण्याची शक्यता आहे, पण कामावर लक्ष केंद्रित करून तो आळस दूर करा. धार्मिक कार्यात सहभागी झाल्यास मनाला शांती आणि सकारात्मक ऊर्जा मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २३३७



**आडवे शब्द :-**
१) विलंब
४) हरीणाक्षी
९) संध्याकाळ
११) बंगाल प्रांत
१२) मर्कट
१३) जुगाराचा एक प्रकार
१५) नाविक दल
१७) जास्तीतजास्त
१९)पगार
२०) पोळ्या भाजण्याचे पात्र
२२) पोकळच्या विरुद्ध
२३) फळांचा राजा
२४) मनाचा झालेला ग्रह
२६) वसुंधरा, वसुमती
२७) धमनी
२९) विष
३१) अश्व
३२) रिकाम्या तिजोरीचा आवाज
३४) मनाला टोचणारे दु:ख
३५)वाळवंट
३६) नारळाचे झाड
३७) गणपतीचे एक नाव
३९) शपथ
४०) वृक्ष
४१) पाषाणमय जमीन
४३) मानवी शरीर
४७) तफावत
४८) माजघर, भोजनशाळा
५०) कपाळ
५१) जननी
५२) मुलगा
५४) भित्रा
५६) विनाकारण
५८) अर्धवर्तुळाकार
६०) मार्ग, रस्ता
६१) साहित्यातील एकूण भावना
६३) मत्स्य
६४) दात
६६) वेळ
६७) कौशल्य
६८) अरण्य
६९) सुविधा
७०) वर्ष (ग्रा.)

**उभे शब्द :-**
१) मृत
२) वर्ण
३) परमेश्वर
४) पाच वर्षाच्या आतील मुलगा, कार्तिकस्वामी
५) गरीब
६) किल्लेदार
७)जावळा
८) अपशकुन, खोडा
१०) जन्म–मृत्यू
१४) धूर्त
१६) वर्षाव, भडीमार
१८) आईची बहीण
२१) गाईचे पिल्लू
२२) फुटलेला आवाज
२५) आवळून बांधणे
२६) शुष्कता
२८) सैन्याला केलेला पुरवठा
३०) विरोध, बंदी
३१) सवाद्य मिरवणूक
३३) पदार्थाच्या कवचावरील निघालेला छोटा तुकडा
३८) गोंधळ, थट्टा, भांडण
३९) वजन
४२) एक चर्मवाद्य
४३) नकला करणारा
४४)आताच, आताच घडलेला
४५) बरोबर आणलेला फौजफाटा
४६) चळत, रास
४९) उंट हाकणारा
५०) शपथ
५१) चिकण माती, मानेवरील सूज
५३) हानी, तोटा
५५) उदर
५६) इंद्रिय
५७) ताप चढण्यापूर्वी अंगावर येणारे शहारे
५९) पुरुष
६१) वाकणे, वाकण्याची क्रिया
६२) आकाश
६३) एक सुगंधी वनस्पती
६५) कृपा, मेहेरबानी
६६) आठवण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कॅलिडोस्कोप

## आईला वृद्धाश्रमात पाठवून नोकरीवर या!

आजच्या काळात, कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या हितासाठी काम करण्याचा दावा करत असताना, भारतातील एका खासगी बँकेतील एका घटनेने हे दावे फोल ठरवले आहेत. सोशल डिस्कशन फोरम 'रेडिट'वर व्हायरल झालेल्या पोस्टने भारतीय कार्य संस्कृतीच्या घसरत्या नैतिकतेवर (वर्कप्लेस टॉक्सिसिटी) एक नवीन वाद निर्माण केला आहे. पोस्टचा शेवट एका प्रश्नाने होतो: 'तुम्ही त्या महिलेच्या जागी असता तर तुम्ही काय केले असते?' ही पोस्ट वाचल्यानंतर सोशल मीडिया युजर्स संतापले आहेत.



रेडिटच्या आर/इंडियनवर्कप्लेस हँडलवर शेअर केलेल्या या कथेनुसार, एका खासगी बँकेत काम करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्याची आई अचानक आजारी पडली. औषधांच्या प्रतिक्रियेमुळे तिची प्रकृती गंभीर होती आणि तिला सतत काळजी घेण्याची आवश्यकता होती. महिला कर्मचाऱ्याने मदतीची अपेक्षा करत तिच्या बॉसकडून काही दिवसांची रजा मागितली, तेव्हा मिळालेला प्रतिसाद धक्कादायक होता. सहानुभूती दाखवण्याऐवजी बॉसने कर्मचाऱ्यावर काम करण्यासाठी दबाव आणला. मॅनेजरने सांगितले, तुमच्या आईची प्रकृती सुधारत नसेल, तर तिला आश्रयगृहात किंवा वृद्धाश्रमात सोडून ऑफिसला या.

हे ऐकून ती महिला निराश झाली. कारण कठीण काळात ज्या संस्थेसाठी तिने वेळेचा विचार न करता काम केले ती तिच्याशी माणूस म्हणून नाही, तर केवळ एक साधन म्हणून वागली. व्यवस्थापकाच्या वागण्यानंतर महिला कर्मचाऱ्याकडे फक्त दोनच पर्याय होते. एकतर तिच्या आजारी आईला सोडून देणे किंवा तिचे करिअर धोक्यात घालणे. अर्थात, तिने तिच्या आईला निवडले. महिलेने ऑफिसला जाणे बंद केले आणि अखेर तिला राजीनामा देण्यास भाग पाडले गेले.

## इमारतीची लांबी किलोमीटर्समध्ये?

जगभरात अनेक उंच इमारती आहेत; परंतु कधी २.७५ किलोमीटर लांबीच्या इमारतीबद्दल ऐकले आहे का? युक्रेनियन शहर लुत्स्कमधील एक अनोखी इमारत अजूनही लोकांना आश्चर्यचकित करते. ही जगातील सर्वात लांब निवासी इमारत मानली जाते आणि तिला प्रेमाने 'चीनची महान भिंत' म्हटले जाते.

ही भव्य इमारत सोबोर्नोस्टी अव्हेन्यू आणि मोलोदेझी स्ट्रीटच्या चौकात आहे. तिची कहाणी थेट सोव्हिएत काळाशी जोडलेली आहे. बांधकाम १९६९ मध्ये सुरू झाले, जेव्हा युक्रेन सोव्हिएत युनियनचा भाग होता. ती पूर्ण होण्यासाठी ११ वर्षे लागली, जी अपार्टमेंट इमारतीसाठी खूप मोठा कालावधी मानली जाते. या प्रकल्पाची कल्पना आर. जी. मेटेलनित्स्की आणि व्ही. के. मालोवित्सा या दोन वास्तुविशारदांनी केली होती.

त्या वेळी त्यांचे ध्येय हजारो लोकांना एकाच वेळी सामावून घेऊ शकेल असे निवासी संकुल तयार करणे होते. ही इमारत पूर्ण झाल्यावर, ती संपूर्ण सोव्हिएत युनियनमधील सर्वात लांब निवासी इमारत बनली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ४० वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतरही, जगात या इमारतीइतकी लांब दुसरी कोणतीही निवासी इमारत बांधलेली नाही.

ही निवासी इमारत २.७५ किलोमीटर लांबीची आहे. खालून या इमारतीचा खरा आकार ओळखणे कठीण आहे. तथापि, वरून पाहिल्यावर त्याची मधाच्या पोळ्यासारखी रचना स्पष्टपणे दिसते.



मुख्य रचना अंदाजे १.७५ किलोमीटर लांब आहे; परंतु जेव्हा विविध संलग्न भाग जोडले जातात तेव्हा त्याची एकूण लांबी २.७५ किलोमीटरपर्यंत पोहोचते. असे म्हटले जाते, की जर एखादी व्यक्ती एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सामान्य गतीने चालत गेली तर त्याला सुमारे एक तास लागतो.

तीन हजारांहून अधिक फ्लॅट्स, अंदाजे दहा हजार लोकसंख्या. ही इमारत स्वतःच एका लहान शहरासारखी आहे.

सुरुवातीच्या काळात, येथे स्थलांतरित झालेल्यांसाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे त्यांची घरे शोधणे. अनेकांनी आठवडे त्यांचे अपार्टमेंट शोधण्यासाठी संघर्ष केल्याचे सांगितले. यामुळे, प्रत्येक क्षेत्रासाठी स्वतंत्र पत्ता प्रणाली तयार करावी लागली. जेव्हा या इमारतीचे फोटो आणि व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर येतात, तेव्हा लोक ते पाहून थक्क होतात. बरेच वापरकर्ते म्हणतात, की ही केवळ एक इमारत नाही, तर सोव्हिएत काळातील विचारसरणी आणि अभियांत्रिकीचे जिवंत उदाहरण आहे. काही जण याला यंत्र म्हणून मानवी जीवनाचे दर्शन म्हणतात, तर काही जण ते त्या काळातील महान विचारसरणीचे प्रतीक मानतात.

## प्रवास करा विनातिकीट!

ट्रेन, बस कशानेही प्रवास करायचा म्हणजे पैसे भरून तिकीट काढणं हे आलंच; पण भारतामध्ये एक अशी अनोखी ट्रेन आहे, जी ७५ वर्षांहून अधिक काळ प्रवाशांकडून एकही रुपया आकारत नाही. ही रेल्वे सेवा पूर्णपणे फ्री आहे. या ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या कोणत्याही प्रवाशाला आजवर तिकीट घ्यावं लागलेलं नाही. ही कोणतीही तांत्रिक चूक, अनुदानातील गडबड किंवा तात्पुरती योजना नसून, हा निर्णय जाणूनबुजून घेण्यात आला आहे.

ही मोफत रेल्वे सेवा १९४८ साली सुरू करण्यात आली. स्वातंत्र्यानंतरचा भारत मोठ्या पायाभूत सुविधा उभारणीच्या टप्प्यात होता. भाक्रा-नांगल धरणाच्या बांधकामासाठी ही रेल्वे उभारण्यात आली होती. धरणाच्या ठिकाणी कामगार, अभियंते तसेच जड यंत्रसामग्री पोहोचवण्यासाठी या रेल्वेचा वापर केला जात होता. बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही ही रेल्वे सेवा परिसरासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली. धरणाचे काम पूर्ण झाल्यावर भाक्रा ब्यास व्यवस्थापन मंडळाने ही सेवा बंद न करता, ती विनामूल्य सुरू ठेवण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला. यामागे कोणताही नफा कमावण्याचा हेतू नव्हता.

**पर्यटनाला चालना**

आज या मोफत ट्रेनचा मुख्य उद्देश भाक्रा धरण परिसरातील पर्यटनाला चालना देणे हा आहे. देशभरातून येणाऱ्या पर्यटकांना या ऐतिहासिक प्रकल्पापर्यंत सहज पोहोचता यावे, अशी व्यवस्थापनाची भूमिका आहे. ही रेल्वे सेवा 'बीबीएमबी'चे कर्मचारी, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच आसपासच्या गावांतील रहिवाशांसाठी दररोज अत्यंत उपयुक्त ठरते. अनेक स्थानिक नागरिकांसाठी नांगल आणि भाक्रा दरम्यान ये-जा करण्याचं हे प्रमुख साधन आहे.



भारतीय रेल्वेप्रमाणे ही सेवा तिकीट विक्रीवर अवलंबून नाही. या ट्रेनचा संपूर्ण खर्च 'बीबीएमबी' कडून केला जातो. व्यवस्थापन या रेल्वेकडे महसूल देणारी सेवा न मानता, रस्ते किंवा कालव्यांप्रमाणे सार्वजनिक सुविधेच्या दृष्टीने पाहते. सुमारे १३ किलोमीटरचा प्रवास करणारी ही ट्रेन आजही डिझेल इंजिनवर धावते आणि यात पारंपरिक लाकडी डबे वापरले जातात.

## रविवारी ट्रेनच्या हॉर्नलाच सुट्टी

भारतीय रेल्वे सध्या नवीन वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या लाँचमुळे चर्चेत आहे. केवळ वंदे भारतच नाही, तर भारतीय रेल्वेने जगातील सर्वात मोठ्या राष्ट्रांनाही आश्चर्यचकित करणारे अनेक विकास उपक्रम हाती घेतले आहेत. भारतीय रेल्वेने अनेक आव्हानात्मक प्रकल्प राबवले आहेत. यामुळेच जगातील सर्वात मोठ्या रेल्वे नेटवर्कमध्ये भारतीय रेल्वेने चौथे स्थान मिळवले आहे. नाव, भव्यता तसेच विविध कारणांसाठी भारतात अनेक रेल्वे स्थानके ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. यापैकीच एक रेल्वे स्थानक आहे जिथे रविवारी ट्रेनचे हॉर्न वाजत नाहीत.

देशाच्या कानाकोपऱ्यात भारतीय रेल्वेचे जाळे पसरले आहे. भारतात अनेक वैशिष्ट्यपूर्ण रेल्वे स्थानके आहेत. यापैकीच एक रेल्वे स्थानक भारताच्या सीमेवर आहे. या रेल्वे स्टेशनवर रविवारी ट्रेनचे हॉर्न वाजत नाहीत. हे रेल्वे स्टेशन पश्चिम बंगालच्या वर्धमान जिल्ह्याजवळ आहे. वर्धमानपासून सुमारे ३५ किमी अंतरावर असलेल्या या स्टेशनवर फक्त बांकुरा-मसाग्राम पॅसेंजर ट्रेन थांबते. ही ट्रेन देखील रविवारी येत नाही आणि स्टेशन पूर्णपणे शांत असते. यामुळे ट्रेनचे हॉर्न वाजवले जात नाहीत किंवा कोणतीही घोषणा केली जात नाही. रविवारी, स्टेशन मास्टर रेल्वे तिकिटे खरेदी करण्यासाठी वर्धमान शहरात जातात. परिणामी, त्या दिवशी स्टेशनवरील तिकीट काउंटर आणि सर्व सेवा बंद राहतात. मनोरंजक गोष्ट म्हणजे या स्टेशनला नाव नाही. नाव नसले तरी, ते स्थानिक प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ते बांकुरा आणि मसग्राम दरम्यान प्रवास करणाऱ्यांसाठी एक लहान; परंतु आवश्यक थांबा म्हणून काम करते. स्थानिकांचा असा दावा आहे, की अशी छोटी स्टेशने मूळतः दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना रेल्वे सेवा देण्यासाठी बांधली गेली होती



## पायांविषयी बोलू काही

आपले पाय शरीराचं सगळं वजन उचलत असतात. प्रत्येकाच्या पायांची रचना वेगळी असते. जगातल्या तब्बल दीड अब्ज लोकसंख्येची पावलं सपाट आहेत. पायांच्या ठश्यांवरून आपण याचा अंदाज बांधू शकतो. जगभरात विविध प्रकारचे खेळ खेळले जातात. खेळताना होणाऱ्या सात दुखापतींपैकी एक दुखापत पायांना होते. पायाच्या अंगठ्याचं नख मुळापासून निघून आलं तर ते पूर्ववत व्हायला सहा महिन्यांचा काळ लागतो. भारताच्या अक्षत सक्सेनाच्या एका पायाला दहा बोटं आहेत. म्हणजे दोन्ही पायांना मिळून २० बोटं आहे. पायांना सर्वाधिक बोटं असलेली व्यक्ती म्हणून त्याचं नाव गिनिज बूकमध्ये नोंदवण्यात आलं आहे. तर सर्वात लांब पायांचा विक्रम अमेरिकेच्या रॉबर्ट वॅडेलोच्या नावे आहे. ते ३७ क्रमांकाची पादत्राणं घालतात. आजारपणाचा खर्च प्रचंड असतो. पायांच्या उपचारांच्या खर्चाचाही जागतिक विक्रम आहे. अमेरिकन कोरिओग्राफर मायकल फ्लॅटलीचा पाय १९९९ मध्ये फ्रॅक्चर झाला होता. त्यावरच्या उपचारांसाठी अडीच अब्जांपेक्षा जास्त खर्च आला होता. माणसाच्या शरीरातली २५ टक्के हाडं पायांमध्ये असतात. माणसाच्या पायांमध्ये ५२ हाडं असतात.





## बर्गर इन स्टाईल

कल्पकता माणसाला कुठेच स्वस्थ बसू देत नाही. कुठल्याही कामात व्यस्त असलो तरी हा किडा डोक्यात वळवळत राहतो आणि कुठल्याशा भन्नाट कृतीतून अभिव्यक्त होतो. व्यवसायानं ग्राफिक डिझायनर असणारे थॉमस वेईल आणि क्युटिन वेईबुच असेच कल्पकतेचा किडा घेऊन फिरणारे. एक दिवस लंच टाईममध्ये कंपनीच्या कँटिनमधलं नेहमीचं बोअरिंग सँडविच खाताना त्यांना बर्गर डिझाईनची कल्पना सुचली. नेहमीच्या साचेबंद बर्गरला अनोखं रूप देण्याची ही कल्पना त्यांनी लगेच कृतीत आणली, इतकंच नव्हे तर, ठिकठिकाणी त्याची प्रात्यक्षिकं दाखवत या अनोख्या कलेवर एक छानसं पुस्तकही काढलं. हे पुस्तक, पर्यायानं ही कला भलतीच लोकप्रिय झाली हे वेगळं सांगायला नको. 'फॅट अँड फ्युरिअस बर्गर' या त्यांच्या वेबसाईटवरही त्यांनी सजवलेले बर्गर्स पहायला मिळतील. सो, लेट्स ट्राय वन्स...

## हक्काचं घर कशासाठी?

जगात अनेक लोक बेघर आहेत. अनेकांकडे स्वत:चं हक्काचं घर नाही. पण रोमानिया या देशाचा विचार केला तर जगातल्या कोणत्याही देशाच्या तुलनेत या देशातल्या सर्वाधिक लोकांकडे घरं आहेत. इथले ९६ टक्के लोक स्वत:च्या हक्काच्या घरात राहतात. १९९० पर्यंत रोमानियामध्ये साम्यवादी राजवट होती. तोपर्यंत इथल्या ७० टक्के घरांवर राज्याचा मालकी हक्क होता. १९९० नंतर सरकारने या घरांची विक्री सुरू केली तेव्हा खरेदी करण्यासाठी लोक अक्षरश: तुटून पडले. त्यावेळी घरांच्या किंमती खूप कमी होत्या. त्या काळात रोमानियाच्या चलनाचं अवमूल्यन होत होतं. यामुळे १९४६ ते १९६४ या काळात जन्मलेल्या लोकांना घर खरेदी करणं सोपं गेलं. इथल्या लोकांना वैयक्तिक मालमत्ता जमा करण्यात समाधान वाटतं. स्वत:चं घर असण्याचे अनेक लाभ आहेत. त्यामुळे इथले अनेकजण आपल्या मुलांनाही घर खरेदी करण्यासाठी प्रेरित करत असतात. २००९ मध्ये आलेल्या जागतिक मंदीच्या काळात रोमानिया सरकारने 'फर्स्ट होम प्रोग्राम' सुरू केला. यामुळे आयुष्यातलं पहिलं घर खरेदी करणाऱ्या लोकांना मदत झाली. या योजनेमुळे बांधकाम क्षेत्राला मदत मिळाली. इतर देशांमधले लोक भाड्याच्या घरात राहतात. त्यात त्यांना कोणताही कमीपणा वाटत नाही. पण रोमानियातल्या लोकांना भाड्याच्या घरात राहणं योग्य वाटत नाही. रोमानियामध्ये भाडेकरूंसाठी कोणतेही नियम नाहीत. इथे भाड्याच्या घरात स्थिरस्थावर होणं खूप कठिण असतं. त्यामुळे इथले लोक हक्काचं घर घेणं पसंत करतात.



## घटस्फोटाची पार्टी

घटस्फोट ही अनेकांसाठी दुखद घटना असते. पती-पत्नींचं विभक्त होणं दु:खदायी असतं. पण नात्यामध्ये विसंवाद असेल तर अशा नात्यांमधून बाहेर पडलेलंच योग्य ठरतं. काहींसाठी घटस्फोट ही मुक्ततेची अनुभूती असते. नको असलेल्या नात्यामधून मिळणारी मुक्ती ते साजरी करतात. अमेरिकेतल्या एका महिलेनेही आपला घटस्फोट अशाच पद्धतीने साजरा केला. टेक्सासमधल्या लाकोस्टमध्ये राहणाऱ्या एका महिलेने लग्नाच्या १४ वर्षांनंतर घटस्फोट घेतला. या घटस्फोटाचा आनंद तिने धूमधडाक्यात साजरा केला. या महिलेने फक्त पार्टीच दिली नाही तर घटस्फोटाची जाहीर घोषणाही केली. ती एवढ्यावर थांबली नाही तर घटस्फोट मिळणार हे जाहीर झाल्यानंतर तिने लग्नप्रसंगी घातलेल्या पेहरावात स्फोटकं भरून तो उडवून दिला. किम्बर्ली सँटलबेन असं या महिलेचं नाव आहे. किम्बर्ली ४३ वर्षांची आहे. आपलं १४ वर्षांचं लग्न तिने संपवलं. लोक मॅरेज पार्टी, बॅचलर पार्टीचं आयोजन करतात. हिने डायवोर्स पार्टीचं आयोजन केलं. या पार्टीत तिचे वडिल आणि बहिणही सहभागी झाले होते. हे लग्न म्हणजे एक फसवणूक होती आणि त्याच्याशी संबंधित कोणत्याही आठवणी आपल्याला नको असल्याचं किम्बर्लीने सांगितलं. या डायवोर्स पार्टीमध्ये केकही कापण्यात आला. ९ नोव्हेंबरला किम्बर्लीचा घटस्फोट झाला आणि १० नोव्हेंबरला तिने पार्टीचं आयोजन केलं.



## इमारती अनेक, व्यक्ती एकच!

या पृथ्वीवर अनेक आश्चर्यकारक गोष्टी, वास्तू, घरे आहेत. काही ठिकाणी तर तुम्हाला एकदम थक्क करणाऱ्या गोष्टी पहायला मिळतात. भारतातील गावांमध्ये शेकडो लोक राहतात. आपल्याकडे बहुसंख्य गावात अनेक सोई-सुविधा असतात; परंतु एका गावात फक्त एक माणूस राहतो. विशेष म्हणजे या गावात अनेक घरे आहेत. मोठे रस्ते आहेत, परंतु तिथे फक्त एकच माणूस राहतो. हा माणूस तिथेच राहून आपले पोट भरतो. कधीकाळी या गावात १२० पेक्षा जास्त लोक राहायचे, परंतु आता तिथे फक्त हा एकटाच टोपी घातलेला माणूस वास्तव्य करतो.

हे गाव पोर्तुगालमध्ये आहे. या अजब गावाचे नाव तलासनल असे आहे. हे गाव मध्य पोर्तुगालच्या डोंगरांमध्ये वसलेले आहे. याच गावात राहणाऱ्या व्यक्तीचे नाव जॉर्ज असे आहे. १९०० सालात या गावात साधारण १२० लोक राहायचे, परंतु या सर्वांनीच हळूहळू हे गाव सोडून दिले. हे गाव फारच दुर्गम भागात आहे. आरोग्य तसेच इतर सुविधा नसल्याने या लोकांनी आपापल्या सोईनुसार गाव सोडून दिले. १९८० सालापर्यंत तिथे फक्त दोन नागरिक शिल्लक राहिले होते. आता तर फक्त जॉर्ज एकटेच या मोठ्या गावात वास्तव्य करतात. या गवात जॉर्ज यांचा एक बार आहे. पर्यटक या गावाला भेट देतात. त्या गावात जाऊन मद्यप्राशन करतात. यातूनच जॉर्ज यांना पैसे मिळतात.



## नागपुरातील माहुलकर, पोटे, बाराभाई यांना
# गुणवत्तापूर्वक सेवेसाठी पदक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :



पोलिस पदकांची घोषणा

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीयगृह मंत्रालयाच्या वतीने पोलीस पदकांची घोषणा करण्यात आली असून यात महाराष्ट्रातील एकूण ७५ पोलिसांना विविध पदके जाहीर झालीत. यात ३१ जणांना शौर्य पदक, ४ पोलीस अधिकाऱ्यांना उत्कृष्ट सेवेकरिता राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक, तर ४० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झाले. यात नागपूरचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक विजय मारोतीराव माहुलकर, पोलिस उपअधीक्षक पराग बापूराव पोटे, पोलीस निरीक्षक कैलाश रामजी बाराभाई यांचा समावेश आहे.

पोलिस दलात नागपुरकरांच्या गौरवाची परंपरा कायम ठेवणारे विजय मारोतीराव माहुलकर हे सध्या लाचलुचपतप्रतिबंधक विभागात असून १९९३ मध्ये पोलीस दलात उपनिरीक्षक म्हणून रुजू झाले. त्यांनी आपल्या सेवाकाळात विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. गुन्ह्यांची उकल करण्यात त्यांची कामगिरी उत्कृष्ट राहिली. यात मालमत्तेचे गुन्हे शोधणे, अनेक राज्यांत कार्यरत असलेल्या टोळ्यांचा पदार्फाश करणे आणि कोटींच्या किमतीचा ४ ट्रक गांजा जप्त करून राज्यभर पसरलेले अमली पदार्थांचे जाळे उद्धवस्त करणे यांचा समावेश आहे.

त्यांनी एक समर्पित, कर्तव्यदक्ष आणि अत्यंत प्रामाणिक अधिकारी म्हणून कामं केले. त्यांच्या कामगिरीची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना आतापर्यंत बेस्ट डिटेक्शन रिकव्हरी, राज्य सरकारचा पुरस्कार, दोन यूएन पदके आणि डी. जी. इन्सिग्निया या सन्मानाचा समावेश आहे. त्यांनी शोधकार्य, कायद्याची अंमलबजावणी, गुन्हे प्रतिबंध, आपत्कालीन प्रतिसाद आणि मदत सेवांमध्ये उत्कृष्ट काम केले आहे.

ट्रॅफिक ब्रँचचे प्रभारी असताना त्यांनी अपघाती मृत्यू कमी करणे, अपघातप्रवण क्षेत्रे कमी करणे आणि वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे यामध्ये कौतुकास्पद कामगिरी केली आहे. याव्यतिरिक्त, प्रशासकीय बाबी, कल्याणकारी समस्या आणि पोलीस भरती यांसारख्या जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे हाताळल्या आहेत. याशिवाय नागपूर पोलिसातील पोलिस उपअधीक्षक पराग बापूराव पोटे, पोलीस निरीक्षक कैलाश रामजी बाराभाई यांनाही गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झाले आहे.

## गडचिरोली पोलीस दलातील ३१ जवानांना राष्ट्रपती शौर्य पदक जाहीर

**गडचिरोली :** नक्षलवादाच्या दहशतीत प्राणांची बाजी लावून दुर्गम भागात कर्तव्य बजावणाऱ्या गडचिरोली पोलीस दलाच्या शिरपेचात प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला मानाचा तुरा रोवला गेला आहे. सन २०१८ मध्ये नक्षलवाद्यांविरुद्ध बोरीया-कसनासूर मोहिमेत शौर्य दाखवणाऱ्या ३१ पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना राष्ट्रपतींचे पोलीस शौर्य पदक जाहीर झाले आहे. देशात जाहीर झालेल्या एकूण १२१ शौर्य पदकांपैकी ३१ पदके एकट्या गडचिरोलीच्या जवानांना मिळाल्याने जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात सुरक्षिततेसाठी तैनात असलेल्या दलाचे मनोबल उंचावले आहे. २२ एप्रिल २०१८ रोजी भामरागड तालुक्यातील बोरीया-कसनासूरच्या घनदाट जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली होती. या एकाच मोहिमेत ४० नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलीस दलाला यश आले होते. नक्षलविरोधी अभियानातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आणि यशस्वी कारवाई मानली जाते. या मोहिमेत प्रत्यक्ष शौर्य गाजवणारे पोलीस निरीक्षक अमोल फडतरे, पोलीस उपनिरीक्षक मधुकर नैताम, वासुदेव मडावी, विलास पोरतेट, संतोष नैताम यांच्यासह ३१ जवानांच्या कामगिरीची दखल आता राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. गेल्या पाच वर्षांत या दलाने एकूण ३ शौर्य चक्र आणि २१७ पोलीस शौर्य पदके मिळवून आपली विशेष ओळख निर्माण केली आहे.

शौर्य पदकांसोबतच ३९४ पोलीस अंमलदारांना पदोन्नती देखील देण्यात आली आहे. यामध्ये कर्तव्य बजावताना वीरगती प्राप्त झालेल्या १४ शहीद जवानांचाही मरणोत्तर सन्मान करण्यात आला आहे. शहीद झालेल्या ७ हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदी, तर ७ पोलीस नाईकांना पोलीस हवालदार पदी मरणोत्तर पदोन्नती देण्यात आली आहे. याशिवाय १० जवानांना त्यांच्या विशेष कामगिरीसाठी वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली. यामध्ये ८२ हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक म्हणून, तर ३०२ पोलीस नाईकांना पोलीस हवालदार म्हणून पदोन्नती मिळाली आहे. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक एम. रमेश, कार्तिक मधीरा आणि गोकुल राज जी. यांनी या सर्व जवानांचे अभिनंदन केले आहे.

## नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात
# ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांच्या समस्यांवर फुंकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या दमदार यशाबद्दल नागरिकांनी नितीन गडकरी यांचे अभिनंदन केले. तर त्याचवेळी अनेकांनी यापूर्वीच्या जनसंपर्क कार्यक्रमातील कार्यवाहीनंतर आपल्या समस्या सुटल्याबद्दल गडकरी यांचे आभारही मानले.



खामला चौकातील जनसंपर्क कार्यक्रमात नितीन गडकरी यांना भेटण्यासाठी नागरिकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. कुणाला समस्यांचे निवेदन द्यायचे होते, कुणाला सदिच्छा भेट घ्यायची होती, तर कुणाला आभार मानायचे होते. नितीन गडकरी यांच्या कार्यालयातून झालेल्या पाठपुराव्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेली प्रशासकीय कामे मार्गी लागल्याबद्दल नागरिकांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी काही ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांनीदेखील नितीन गडकरी यांची भेट घेतली. सरकारी योजनांमधून मदत मिळण्यासंदर्भात ज्येष्ठांनी निवेदने दिली. श्रावणबाळ, संजय गांधी निराधार यासारख्या योजनांच्या संदर्भात ज्येष्ठांना सहकार्य करण्याचे निर्देश नितीन गडकरी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. तर दिव्यांग बांधवांनी सरकारी योजनांमधून सहकार्य मिळण्यासोबतच कृत्रिम अवयवांच्या मागणीसाठी नितीन गडकरी यांना निवेदन दिले. त्यांच्या समस्यांवर फुंकर घालण्याचे काम जनसंपर्क कार्यक्रमातून झाले.

विविध संस्थांचे प्रतिनिधी आपल्या संस्थांच्या अडचणी घेऊन यावेळी आले होते. काहींनी निधी, जागा किंवा परवानग्यांसंबंधी समस्या मांडल्या. सामाजिक व धार्मिक संस्थांनी त्यांच्या समुदायातील प्रश्न तसेच उपक्रमांसाठी मदतीची विनंती करणारी निवेदने दिली. गडकरी यांनी सर्व नागरिकांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकून घेतले आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. नागपूर महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, सेतू कार्यालय, नासुप्र, आरोग्य विभागांमधील अधिकारी जनसंपर्क कार्यक्रमात उपस्थित होते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या समस्या सोडविणे अधिक सोयीचे ठरले.

## हळदी-कुंकवासाठी निघालेल्या
# दोन बहिणींचा अपघाती मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

नागपूर-भंडारा महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाला आहे. हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमासाठी जात असताना एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. मृतांमध्ये २६ वर्षीय अलिशा अनिकेत मेहर (भूगाव, कामठी) आणि २७ वर्षीय मोनाली दिनेश्वर घाटोळे (तायगाव खैरी, सौसर, मध्य प्रदेश) यांचा समावेश आहे.

या दुर्दैवी घटनेने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अलिशा मेहर यांचे लग्न सात महिन्यांपूर्वीच झाले होते. तर मोनाली घाटोळे यांचे लग्न येत्या २६ फेब्रुवारी रोजी निश्चित झाले होते. लग्नाची खरेदी आणि तयारी जोरात सुरू असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला.

हा अपघात नागपूर-भंडारा महामार्गावरील महालगावनजीक नागनदीच्या पुलावर भर दुपारी घडला. पिपळा डाक बंगला परिसरातून भूगाव येथे हळदी-कुंकवासाठी जात असताना पाठीमागून येणाऱ्या एका अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की, अलिशा मेहर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या मोनाली घाटोळे यांनी रुग्णालयात नेत असताना वाटेतच अखेरचा श्वास घेतला. त्या नणंद-भावजय (मामे-आत्ते बहीण) होत्या.

या अपघातानंतर महामार्गावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. धडक देऊन पसार झालेल्या वाहनचालकाचा शोध घेण्यासाठी पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण नागपूर जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## विकासाच्या नावाखाली जैवविविधतेचा बळी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :



अनिल देशमुखांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्र्यांना पत्र

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य व्याघ्र मार्गिकेत प्रस्तावित लोहखनिज खाणीला राज्य वन्यजीव मंडळाने दिलेल्या परवानगीविरोधात माजी गृहमंत्री तथा काँग्रेस नेते अनिल देशमुख यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. या निर्णयाचा तातडीने पुनर्विचार करावा, अशी मागणी करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांना स्वतंत्र निवेदने दिली आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पलगतच्या लोहारगड परिसरात लोहखनिज खाणीस परवानगी देण्यात आली आहे. हा परिसर वाघांसाठी अत्यंत संवेदनशील असून, सध्या येथे ६० हून अधिक वाघांचा अधिवास आहे. खाण प्रकल्प प्रत्यक्षात आल्यास वाघांचे अस्तित्वच धोक्यात येईल. या खाण प्रकल्पासाठी सुमारे १८ हजारांहून अधिक झाडांची तोड होणार असून, त्यामुळे परिसरातील पर्यावरणाचे कधीही न भरून निघणारे नुकसान होईल. तसेच, खाणीच्या कामामुळे नैसर्गिक जलस्त्रोत बंद होण्याची भीती असून, त्याचा थेट परिणाम वन्यजीवांच्या जीवनचक्रावर होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. विशेष म्हणजे, राज्य वन्यजीव मंडळातील अनेक तज्ज्ञ सदस्यांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवला असतानाही, प्रशासकीय पातळीवर याला मंजुरी देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील नैसर्गिक व्याघ्र मार्गिका (कॉरिडॉर) बाधित झाल्यास वाघ मानवी वस्त्यांकडे वळण्याची शक्यता वाढेल आणि त्यामुळे भविष्यात मानवझवन्यजीव संघर्ष अधिक तीव्र होण्याचा धोका आहे, असे देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.

ताडोबा हा महाराष्ट्राच्या जैवविविधतेचा मानाचा तुरा असून जागतिक स्तरावर त्याचे महत्त्व आहे. विकासाच्या नावाखाली अशा मौल्यवान जैवविविधतेचा बळी देणे योग्य ठरणार नाही, असे मत व्यक्त करत देशमुख यांनी खाण प्रकल्पाच्या परवानगीचापुनर्विचार करावा. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने या लोहखनिज खाण प्रकल्पास अंतिम मंजुरी देऊ नये, अशी विनंतीही अनिल देशमुख यांनी निवेदनात केली आहे.

## तब्बल आठ वर्षांनंतर पिता-पुत्राची पुर्नभेट

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २५ :



कुटुंबापासून वेगळा होऊन बेपत्ता झालेल्या मुलाला जगण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. सहा राज्यांमध्ये भटंकती केल्यानंतर बेपत्ता मुलाने आपल्याला कोणीही नसल्याने सांगत हिमाचल प्रदेशमध्ये एका गोशाळेत नोकरी पत्करली. पोलीस पडताळणीमध्ये मात्र सत्य समोर आले. तब्बल आठ वर्षांनी पिता-पुत्राची हृदयस्पर्शी पुर्नभेट घडून आली. यावेळी त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले होते.

आई-वडील वेगळे राहत असतांना १२ वर्षीय मुलगा २०१८ मध्ये घर सोडून गेला होता. पोलीस पडताळणीमध्ये उलगडा होऊन आठ वर्षांनंतर नवतरुण व वडिलांचे पुनर्मिलन झाले. जयेश बोदडे (१९) असे त्या तरुणाचे नाव. २०१८ साली जयेश व त्याचा भाऊ योगेशसह त्यांच्या आईने घर सोडले. ते शेगावला गेले. योगेश अकोला जिल्ह्यातील अकोट येथे आपल्या वडिलांकडे परताला. जयेश आईसोबतच राहत होता. आईसोबत वाद झाल्याने तो २०१८ मध्येच घरातून निघून गेला. त्याने मध्य प्रदेश गाठले. काही मित्र बनवून त्याने तीन महिने काढले. त्यानंतर गोवा, नवी दिल्ली, चंदिगड, जम्मू-काश्मीर अशी भटकंती करून तो हिमाचल प्रदेशमध्ये पोहोचला. त्याठिकाणी जयेश पाच वर्षांपासून राहत होता.

दरम्यान, अकोल्यात मोलमजुरी करणारे वडील सुधाकर बोदडे यांनी खदान पोलीस ठाण्यात मुलगा बेपत्ता असल्याची तक्रार २०१८ मध्येच केली होती. अनेक वर्षांपासून मुलाचा पत्ताच लागला नसल्याने त्यांनी आशा देखील सोडली होती. हिमाचल प्रदेशमधील रामपूर येथील गोशाळेत जयेशला नोकरीवर ठेऊन घेतले. त्याने आपली कुठलीही पार्श्वभूमी सांगितली नव्हती. डिसेंबर महिन्यात नियमित पोलीस पडताळणीमध्ये कामगारांना ओळखपत्रे सादर करण्यास सांगितले होते. जयेशकडे आधार कार्ड किंवा इतर कोणतेही वैध कागदपत्र नसल्याने पोलिसांनी त्याची चौकशी केली. तेव्हा त्याने पोलिसांना माहिती दिली.

शिमला येथील स्थानिक पोलिसांनी अकोला जिल्ह्यातील अकोट पोलिसांशी संपर्क साधला. हे प्रकरण बेपत्ता कक्षामध्ये पोहोचले. १० जानेवारी रोजी अकोल्यातील खदान पोलिसांनी जयेशशी दुरध्वनीद्वारे संवाद साधून त्याच्या वडिलांना माहिती दिली. जयेशची परत येण्याची इच्छा नव्हती. मात्र, त्याला वडिलांना भेटायचे होते. पोलिसांनी व्हिडिओ कॉलवरून त्याच्या वडिलांशी बोलणे करून दिले. १४ व १५ जानेवारी रोजी सुधाकर बोदडे शिमल्याला गेले. आठ वर्षांनंतर वडील आणि मुलाची अखेर शिमल्यामध्ये भेट घडली. त्यानंतर ते दोघे एकत्र अकोल्याला परत आले आहेत. शिमला व अकोला पोलिसांच्या पुढाकारातून आठ वर्षांपासून हजारो कि.मी. दूर राहणाऱ्या पिता-पुत्राची पुनर्मिलन झाले. जयेश आपल्या वडिलांसह अकोल्यात घरी परतला आहे.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावर यंदा
# मूक योद्ध्यांचा जयघोष

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ :



प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर होणारे संचलन हे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचेच आकर्षण असते. विविध राज्यांची संस्कृती, कला, परंपरा उलगडणारे चित्ररथ, प्रशासनाच्या कायार्चा आढावा देणारी पथके आणि देशाच्या सुरक्षा यंत्रणांकडून सादर होणारी थरारक प्रात्यक्षिके पाहण्यासाठी देश-विदेशातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. त्यामुळे दरवर्षी संचलनात काहीतरी वेगळे, नवे सादर करण्याचा प्रयत्न केला जातो. यंदाही सोमवारी होणाऱ्या या संचलनामध्ये अनेक उल्लेखनीय चित्ररथ आणि पथके पाहायला मिळणार असून, त्यातील एक प्रमुख आकर्षण असणार आहे ते भारतीय लष्कराचे प्राणी-पक्षी पथक.

दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, रणगाडे आणि जवानांची शिस्तबद्ध प्रात्यक्षिके संचलनात दिसणार आहेतच; मात्र यंदा लष्कराच्या ताफ्यात रिमाउंट अँड व्हेटरनरी कोअर या शाखेतील अनोखे मूक योद्धे सहभागी होत आहेत. या पथकात दोन मदार असलेले बॅक्ट्रियन उंट, झांस्करी घोडे, शिकारी पक्षी तसेच भारतीय श्वान जातींचा समावेश आहे. देशाच्या संरक्षणासाठी प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या या प्राण्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी त्यांना कर्तव्यपथावर स्थान देण्यात आले आहे.

युद्धात किंवा संरक्षणासाठी प्राणी-पक्ष्यांचा वापर ही संकल्पना नवी नाही. प्राचीन काळापासून विविध संस्कृतींमध्ये प्राण्यांची कौशल्ये ओळखून त्यांचा युद्धनीतीत वापर केला गेला आहे. संदेशवहनासाठी कबुतरे, हेरगिरीसाठी शिकारी पक्षी, तर समुद्रात डॉल्फिनसारख्या प्राण्यांचा वापर झाल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही काही मोहिमांमध्ये मधमाश्यांचा वापर केल्याचे उल्लेख सापडतात. भारतीय लष्करामध्ये आजही प्राण्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. हिमालयातील दुर्गम, उंच भागांमध्ये रसद, इंधन आणि शस्त्रास्त्रे पोहोचवण्यासाठी खेचरांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. एकदा मार्ग शिकला की तो न विसरणारी त्यांची क्षमता जवानांसाठी मोलाची ठरते. अशाच एका खेचराची - पेडोंगी - शौर्यगाथा आजही लष्करात सांगितली जाते. यंदाच्या संचलनात विशेष लक्ष वेधून घेणार आहेत बॅक्ट्रियन उंट. लडाखसारख्या १५ हजार फुटांहून अधिक उंचीवरील, उणे तापमानाच्या प्रदेशात हे उंट २५० किलोपर्यंत ओझे वाहू शकतात. ऑक्सिजनची कमतरता असलेल्या भागातही ते सहज तग धरतात.

इंडियनऑयल
IndianOil
गौरी सर्वो सेंटर
प्रो.प्रा. नरेंद्र हेमणे
समस्त जनतेला प्रजासत्ताक दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
मा.नरेंद्र हेमणे
सदस्य, स्थायी समिती, नगरपरिषद नागभीड
सभापती, स्वच्छता आरोग्य व सार्वजनिक आरोग्य समिती, नगरपरिषद नागभीड.

सरसेनानी आंनदराज आंबेडकर साहेब
रिपब्लिकन सेना राष्ट्रीय अध्यक्ष
चिमूर घोडायात्रेच्या समस्त जनतेला हार्दिक शुभेच्छा
मा.प्रफ्फुल भाऊ शेंडे
रिपब्लिकन सेना विदर्भ प्रमुख
भिम आर्मी संविधान रक्षक दल संस्थापक
रिपब्लिकन सेना
समस्त जनतेला ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

समस्त जनतेला प्रजासत्ताक दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
मा.संजय हो. गजपुरे
माजी सदस्य, जि.प. चंद्रपूर
संचालक, नागभीड तालुका खरेदी विक्री सोसायटी
सौ. किरण सं. गजपुरे
सिनेट सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
26 Jan
मा.प्रतीक कमलकुमार भसीन
उपाध्यक्ष, नगरपरिषद, नागभीड
सदस्य, स्थायी समिती, नगरपरिषद नागभीड
सभापती, पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती, नगरपरिषद नागभीड.

प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
आमचे प्रेरणास्थान
स्व.वामनरावजी वनमाळी
मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी व्दारा संचालित
राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय नागभीड
जि. चंद्रपूर ४४१२०५
नॅक मानांकित 'बी' दर्जा (गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित)
आमचे श्रध्दास्थान
स्व.मुरलीधररावजी वनमाळी
प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..
श्री.रिध्देश्वर वा. वनमाळी
सचिव मनोहर भाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी
डॉ.गणपत डी. देशमुख
(एम. एस्सी, नेट, पी. एच. डी.)
कार्यकारी प्राचार्य, राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय, नागभीड
'शिक्षण हा आमचा धर्म, दर्जा हाच आमचा मार्ग तो आम्ही निभवतोय आमच्या वैशिष्ट्यांसह'
'आमचा एकच ध्यास, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास'
प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, राष्टपिता महात्मा गांधी महाविद्यालय, नागभीड